# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २१२) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.२२ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## राज्यात मान्सूनची विश्रांती!; शेतकरी चिंतेत

पुणे/मुंबई दि.२१ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रातील हवामानात पुन्हा एकदा मोठा बदल पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्याला झोडपून काढणाऱ्या पावसाचा जोर आता ओसरला असून, पुढील चार ते पाच दिवस राज्यातील कोणत्याही जिल्ह्याला जोरदार पावसाचा इशारा देण्यात आलेला नाही. सर्वसामान्यांना मुसळधार पावसापासून दिलासा मिळाला असला, तरी ऐन मोक्याच्या वेळी पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत मात्र भर पडली आहे.

२१ ऑगस्ट रोजी संपूर्ण कोकण विभागात पावसाचा कोणताही अलर्ट नाही. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळतील. मात्र, पुढील ४-५ दिवस पावसाचा जोर कमी राहील. या काळात वातावरणात दमटपणा जाणवेल आणि काही काळ सूर्यदर्शन होण्याचीही शक्यता आहे.

धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांत केवळ हलक्या पावसाचा अंदाज आहे. पावसाच्या उघडीपमुळे या भागात पावसाची तूट निर्माण होत असून, पिकांच्या वाढीसाठी दमदार पावसाची नितांत आवश्यकता आहे. दुसरीकडे, मराठवाड्यातही पावसाची मोठी दडी पाहायला मिळत आहे. छत्रपती संभाजीनगर, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड आणि लातूर या जिल्ह्यांत हलका ते मध्यम पाऊस पडेल; मात्र जोरदार पावसाची शक्यता नाही.

## सणासुदीच्या काळात साखर महागल्याने सर्व सामान्य नागरिकांना फटका

मुंबई दि.२१ (प्रतिनिधी)- सध्या राज्यातील बाजारपेठेत साखरेनं मोठी उसळी घेतल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. या साखरेच्या वाढत्या दराचा ग्राहकांना मोठा फटका बसत आहे. सध्या साखरेच्या इतिहासात सर्वात मोठी वाढ झाली असल्याने ऐन सनासुदीच्या काळात सर्वसामान्य नागरिकांवर खर्चाचा बोजा वाढला आहे. महागाईच्या दराने जनता होरपळू लागली आहे.

साखर ७ हजार ५०० प्रति क्विंटलवर गेली आहे. तर वाशिम जिल्ह्यात किरकोळ बाजारात साखरेचे दर ८० रुपयांवर गेले आहेत. याचा ग्राहकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. दरम्यान, आगामी काळात साखरेच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे साखरेच्या वाढत्या दराचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या घरगुती बजेटवर होण्याची शक्यता आहे.

हिंगोलीत साखरेचे दर तब्बल ७५ रुपये किलोपर्यंत पोहोचलेत. साखरेच्या दरात झालेली ही मोठी वाढ आता थेट मिठाई व्यवसायाच्या गणितावर परिणाम करू लागली आहे. कारण मिठाई तयार करण्यासाठी साखर हा सर्वात महत्त्वाचा आणि मोठ्या प्रमाणात वापरला जाणारा घटक आहे. त्यामुळे साखर महागली आणि मिठाई विक्रेत्यांचा उत्पादन खर्चही वाढला आहे. याचा परिणाम मिठाईच्या दरांवर होण्याची शक्यता आहे.

हिंगोली (पान ४ वर)

### इथेनॉलमुळे साखरेचे दर वाढले नाहीत, केंद्र सरकारचे स्पष्टीकरण

नवी दिल्ली दि.२१ (वृत्तसंस्था)- भारतात गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने साखरेच्या किमती झपाट्याने वाढ होताना दिसत आहे. घाऊक बाजारात साखरेचा दर तब्बल ८० रुपये किलोपर्यंत पोहोचला आहे. इथेनॉलच्या उत्पादनासाठी उसाचा वापर वाढल्यामुळे साखरचे दर वाढले आहेत, असा दावा विरोधी पक्षांकडून केला जात आहे. परंतु, केंद्र सरकारने साखरेच्या दरवाढीला इथेनॉल जबाबदार नाही, असे स्पष्टीकरण दिले आहे.

साखरेच्या दरवाढीला इथेनॉलला दोष देणे चुकीचे आहे. २०२२-२३ मध्ये इथेनॉल बनवण्यासाठी १२ टक्के साखर वापरली जायची, ती आता कमी होऊन ९ टक्क्यांवर आली आहे. आता देशात तयार होणाऱ्या एकूण इथेनॉलपैकी पाऊण ७५ टक्के भाग हा साखरेऐवजी धान्यापासून, विशेषतः मक्यापासून बनवला जातो. इथेनॉलच्या निर्मितीमुळे साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती मजबूत झाली आहे. कारखान्यांची आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे २० ऑगस्ट २०२६ पर्यंत ऊस उत्पादक शेतकऱ्यांची ९७ टक्के थकबाकी देण्यात आली आहे. २०१४ ते २०२१ या काळात सरकारल ा साखर उद्योगाला तब्बल १४,६०० कोटी रुपयांचे अनुदान द्यावे लागले होते. परंतु, २०२१-२२ पासून साखर उद्योगाला कोणत्याही सरकारी अनुदानाची गरज पडलेली नाही.

यावर्षी देशात साखरेचे एकूण उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी झाले आहे. अवकाळी आणि वाईट हवामानामुळे ऊसाच्या पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. सण-उत्सवांचे दिवस असल्याने बाजारात साखरेची मागणी अचानक वाढली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरही साखरेचा पुरवठा कमी झाला आहे. तसेच व्यापाऱ्यांनी केलेली साखरेची साठेबाजी आणि सट्टेबाजी यामुळेही दर वाढले आहेत, असे सरकारकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे. दरम्यान, बाजारात साखरेचा किरकोळ भाव ८० रुपये प्रति किलोवर पोहोचल्यानंतर सरकारने ही कारणे दिली आहेत.

चालू हंगामात देशात ३०६ लाख टन साखरेचे उत्पादन होण्याचा अंदाज आहे. सुरुवातीला ऊस उत्पादक राज्यांनी ३४३ लाख टनांचा अंदाज वर्तवला होता. मात्र, अतिवृष्टी, शेतात पाणी साचणे आणि उसावर पडलेला रेड रॉट व टॉप बोरर या कीड-रोगांच्या प्रादुर्भावामुळे साखरेचे उत्पादन घटले आहे. उत्पादन घटले असले तरीही ऑक्टोबरमध्ये नवीन गाळप हंगाम सुरू होईपर्यंत देशातील साखरेची मागणी पूर्ण करण्यासाठी पुरेशी साखर शिल्लक आहे, असा दिलासा सरकारने दिला आहे. दरम्यान, २०२६-२७ या काळात जगभरात सुमारे ३३ ल ाख टन साखरेची तूट भासण्याचा अंदाज आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात ३० जून रोजी ४७४ डॉलर्स प्रति टन असणारे साखरेचे दर २० ऑगस्टपर्यंत ५५२ डॉलर्स प्रति टनावर पोहोचले आहेत. अवघ्या दोन महिन्यांत जागतिक बाजारात साखरेच्या दरात १६ टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे.

## पेलेट गन गोळीबार प्रकरणी राहुल गांधींच्या ठिय्या आंदोलनानंतर दिल्ली पोलिसांकडून अखेर एफआयआर दाखल



नवी दिल्ली दि.२१ (वृत्तसंस्था)- लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी नवी दिल्लीतील संसद मार्ग पोलीस स्टेशनमध्ये पॅलेट गनमुळं जखमी झालेल्या साहिल लोचब याच्यासोबत ८ तास ठिय्या आंदोलन केलं. साहिल लोचब पॅलेट गनमुळं दुखापग्रस्त झाल्यानं या प्रकरणात एफआयर दाखल करण्यासाठी राहुल गांधी यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. अखेर ८ तासांच्या आंदोलनानंतर साहिल लोचब याची एफआयर दाखल करुन घेण्यात आली. या प्रकरणात राहुल गांधी यांनी भूमिका मांडली. या प्रकरणात एफआयआर दाखल होणं न्यायाच्या दिशेनं पहिलं पाऊल असल्याचं राहुल गांधी म्हणाले.

साहिल लोचब याच्या शरीरात छर्रे आहेत त्याला एक महिना झालाय. तीन छर्रे डोळ्यात आहेत, तीन चार छर्रे हृदयाजवळ आहेत. एका युवकावर अन्याय झालाय हे स्पष्ट होतं. आम्ही साडे अकरा वाजता इथं आलोय, आता पावणे सात वाजलेत तेव्हा एफआयर दाखल झाला आहे, असं राहुल गांधी यांनी म्हटलं.

नवी दिल्लीतील मध्यवर्ती ठिकाणी पोलीस स्टेशन आहे, तिथं न्याय मिळत नाही. आम्ही भारताच्या नागरिकासाठी, त्याच्या आई वडिल ांसाठी न्याय मागितला आहे. त्यासाठी आठ तास लागले, असं राहुल गांधी म्हणाले. अंतिम परवानगी गृहसचिव आणि अमित शाह यांना द्यावी लागली, तेव्हा फायनल एफआयआर दाखल केली, असं राहुल गांधी यांनी म्हटलं. स्थानिक पोलिसांना एफआयआर करायची होती, मात्र, वरिष्ठ पातळीवरुन ब्रेक लागला होता, असा दावा राहुल गांधी यांनी केला.

विद्यार्थ्यांवर कथित पॅलेट गन कोणी चालवली? या प्रकरणात आतापर्यंत गुन्हा का दाखल झाला नाही? असे अनेक सवाल उपस्थित करत गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी राहुल गांधी हे पीडित विद्यार्थ्यांसह दिल्लीतील संसद मार्ग पोलीस ठाण्यात पोहोचले. जोपर्यंत पोलीस गुन्हा दाखल करत नाहीत, तोपर्यंत पोलीस ठाण्याच्या बाहेर आपण ठिय्या आंदोलन करण्याची भूमिका राहुल गांधी यांनी घेतली. अखेर पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आल्याचे वृत्त इंडियन एक्सप्रेसकडून देण्यात आले आहे.

साहिल लोचब हा मूळचा हरियाणाचा युवक आहे. सीजेपी (पान ४ वर)

## अमित शाह यांना उपपंतप्रधान व्हायचे आहे; पृथ्वीराज चव्हाण यांचे विधान

नाशिक दि.२१ (प्रतिनिधी)- काँग्रेसच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत खासदार राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची राजकीय कारकिर्द शेवटाकडे आली असल्याचे म्हटले होते. पंतप्रधान मोदींच्या उत्तराधिकाऱ्याचा शोध सुरू असून मोदी सरकार बॅकफूटवर आहे, असे विधान राहुल गांधी यांनी केले होते. त्यांच्या या विधानावर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी भाष्य केले आहे. नाशिकमध्ये पत्रकारांशी बोलत असताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, सरकारच्या विरोधात वातावरण तयार झाले आहे.

भाजपामध्ये अंतर्गत वाद सुरू असल्याचे सांगताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, "अमित शाह म्हणत आहेत, मला उपपंतप्रधान करा. म्हणजे मी पुढचा चेहरा असेन. नव्या चेहऱ्याचा शोध सुरू आहे. ही मोदी सरकारच्या शेवटाची सुरुवात झाली आहे. अडीच वर्षांत हे काही होणार नाही. आम्ही २०२९ ची वाट पाहू. महात्मा गांधींच्या शांततेच्या मार्गाने देशात निश्चितच सत्ताबदल होईल."

"पंतप्रधान मोदी यांनी आजवर (पान ४ वर)

## शक्तीपीठ महामार्ग शेती, शेतकरी उध्वस्त करणारा; विरोधात सांगलीत मोर्चा

सांगली दि.२१ (प्रतिनिधी)- शेती आणि शेतकरी उध्वस्त करणारा शक्तीपीठ महामार्ग कोणत्याही स्थितीत होउ देणार नाही असा निर्धार शुक्रवारी सांगली जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आलेल्या मोर्चावेळी व्यक्त करण्यात आला. शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीने आयोजित करण्यात आलेल्या मोर्चामध्ये माजी खासदार राजू शेट्टी यांच्यासह आमदार जयंत पाटील, आ.सतेज पाटील, खासदार विशाल पाटील, कॉम्रेड धनाजी गुरव, बी.जी.काका पाटील आदींसह बाधित गावातील शेकडो महिलांसह कार्यकर्ते, शेतकरी सहभागी झाले होते. विश्रामबाग येथील क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या पुतळ्याला अभिवादन करून या मोर्चाचा प्रारंभ करण्यात आला. या ठिकाणाहून हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय येथे आला. या ठिकाणी मोर्चाचे रूपांतर सार्वजनिक सभेत झाले.

यावेळी बोलताना सतेज पाटील म्हणाले, विविध योजनेतून गरीबांना द्यायला सरकारकडे पैसे नाहीत. मात्र, एक लाख १० हजार कोटींचे कर्ज काढून रस्ता तयार करण्याचे प्रयोजन आखले गेले आहे. जर सरकारकडे पैसेच असतील तर सरकारने राज्यातील शिवरायांच्या गडकोटांना प्रत्येकी ५०० कोटी द्यावेत, या माध्यमातून आमचा इतिहास भावी पिढ्यासाठी सुरक्षित होईल, राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीला प्रत्येकी एक कोटी रूपये द्यावेत, यातून गावचे रस्ते सुधारतील, शाळा सुधारतील. यापुढे काही खासगी माणसे जमिन घेण्यासाठी येतील, मात्र या खासगी व्यक्ती दहा टक्के कमिशनने सरकारने नियुक्त केल्या आहेत. अशांना शेतकऱ्यांना थारा देउ नये असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी बोलताना आमदार जयंत पाटील म्हणाले, नागपूर ते पत्रादेवी यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध असताना आणि कोणाचीही मागणी नसताना शक्तीपीठ महामार्ग लादला जात आहे. आजपर्यंत मुंबईच्या आझाद मैदानावर वेगवेगळी आंदोलने झाली. मात्र, कधीही कंत्राटदारांचे आंदोलन झाले नव्हते. कंत्राटदारांची ९० हजार कोटींची देयके थकित आहेत. हा वसंतदादांचा, क्रांतीसिंह नाना पाटलांचा जिल्हा आहे. येथील इतिहास क्रांतीकारकांचा आहे.सरकारने हे ओळखून शक्तीपीठाबाबत पुनर्विचार करावा.

## राज्यातील काँग्रेस नेत्यांचा केंद्रातील नेत्यांसोबत समन्वयाचा अभाव-सुप्रिया सुळे

मुंबई दि.२१ (प्रतिनिधी)- मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावरून काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी शरद पवारांना टोला लगावल्यानंतर त्यावर खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. मनुस्मृतीवाद्यांसोबत जाऊ नका, असं पृथ्वीराज चव्हाण म्हणाले होते. त्यावर राज्यातील काँग्रेसचे नेते राष्ट्रवादीला चुकीच्या बॉ क्समध्ये बसवतात, कदाचित केंद्रातील काँग्रेस नेत्यांसोबत त्यांचे समन्वय नसावे, असा टोला सुप्रिया सुळे यांनी लगावला.

केंद्रातील काँग्रेस नेत्यांसोबत आमचा सातत्याने संवाद असतो, मात्र राज्यातील काँग्रेस नेते राष्ट्रवादीला नेहमी चुकीच्या बॉक्समध्ये बसवतात. महाराष्ट्र आणि दिल्लीतील काँग्रेस नेत्यांच्या संवादात गॅप असल्याचं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

शरद पवार यांनी स्थापन केलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा संघटनात्मकदृष्ट्या सुप्रीम कोर्टात अद्याप लढाई लढत आहे. इलेक्शन कमिशनमध्ये भलेही अजित पवार गट जिंकला असेल, परंतु सर्वोच्च न्यायालयात आमची ही नैतिकतेची लढाई सुरूच राहील, (पान ४ वर)

## दिल्लीत 'आरक्षण हटवा' आंदोलनाला अखेर पोलिसांची परवानगी; गुणवत्तेवर आधारित समान संधीची मागणी

नवी दिल्ली दि.२१ (वृत्तसंस्था)- आरक्षण हटवा आंदोलनास दिल्ली पोलिसांनी परवानगी दिली आहे.दिल्ली पोलिसांनी आंदोलनासाठी आवश्यक ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे. शुक्रवारपासून रामलीला मैदानावर हे आंदोलन होणार आहे. सायंकाळी चार वाजेपर्यंत जास्तीत जास्त ५०० लोकांना आंदोलनासाठी पोलिसांनी परवागनी दिली आहे. कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून या आंदोलनासाठी हरकत नाही अशा प्रकारचा परवाना पोलिसांनी देऊ केला आहे.

नीट पेपरफुटीनंतर देशभर नागरिकांनी संताप व्यक्त केला होता. यानंतर कॉक्रोच जनता पार्टीच्या माध्यमातून या आंदोलनाला गती मिळाली व देशभर नागरिक आणि तरुण रस्त्यावर उतरले. याच धर्तीवर आता आरक्षण हटवा मोहीम इन्स्टाग्रामवर वेग घेऊ लागली आहे. या मोहिमेच्या माध्यमातून नागरिकांना दिल्लीत आंदोलनासाठी बोलविण्याचा प्रयत्न केला जात आहे. इन्स्टाग्रामवर या मोहिमेला ५.६ मिलियन फॉलोवर्स मिळाले आहेत. दिल्ली पोलिसांनी जंतर मंतरवर या आंदोलनासाठी परवानगी नाकारली होती.

दिल्ली पोलिसांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर स्पष्टीकरण दिले आहे. या आंदोलनासाठी जंतर मंतरवर परवानगी देण्यात आलेली नाही, असे पोलिसांनी गुरुवारी स्पष्ट केले. दरम्यान, दिल्ली पोलिसांनी रामलीला मैदानावर आता या आंदोलनासाठी परवानगी दिली आहे. पण, पोलिसांनी या आंदोलनासाठी मोर्चा आणि आंदोलनस्थळी मुक्काम करण्यास मज्जाव केला आहे. तसेच, पोलिसांकडून येणाऱ्या सूचनांचे पालन करावे असेही स्पष्ट करण्यात आले आहे. आंदोलनकांनी पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन न केल्यास ना हरकत परवाना केव्हाही रद्द केला जाईल, असेही स्पष्ट केले आहे.

## गेल्या २० वर्षांपासून रखडलेल्या पदोन्नत्या मार्गी लावणार-चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर दि.२१ (प्रतिनिधी)- राज्यातील महसूल अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. गेल्या दीड वर्षांत सुमारे ९५० अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली असून, त्यांना पूर्ण अधिकार देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. गेल्या २० वर्षांपासून थांबलेल्या सर्व पदोन्नत्या मार्गी लावण्याचा आमचा मानस आहे, अशी माहिती भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. आज तब्बल ४० हून अधिक तहसीलदारांना उपजिल्हाधिकारीपदी, तर २२ नायब तहसीलदारांना तहसीलदारपदी पदोन्नती मिळाली असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय, या देशात राहायचे असेल तर वंदे मातरम म्हणावेच लागेल, असे विधानही त्यांनी यावेळी केले.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, आदर्श घोटाळ्यानंतर महसूल विभागाच्या जागेवर गृहनिर्माण सोसायट्या स्थापन करण्यासाठी कोणतेही स्पष्ट धोरण अस्तित्वात नव्हते, असा उल्लेख करत बावनकुळे म्हणाले, यासंदर्भात कालच एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली आहे. लवकरच राज्य शासन यावर नवीन धोरण जाहीर करणार आहे. यामुळे नागरिकांना वाजवी दरात घरे मिळणे शक्य होईल आणि राज्यातील सुमारे ७० हजार सोसायट्यांचा प्रलंबित प्रश्न सुटेल. सर्वांसाठी घरे ही योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी आमचे विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत.

## अमेरिकेने आरएसएसला दहशतवादी संघटना घोषित केले; नाना पटोले यांचा खळबळजनक दावा

मुंबई दि.२१ (प्रतिनिधी)- काँग्रेस नेते नाना पटोले यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि खळबळजनक आरोप केला आहे. "अमेरिकेने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला आतंकवादी संघटना म्हणून घोषित केले आहे," असा धक्कादायक दावा पटोले यांनी केला आहे. तसेच, संघाच्या जागतिक स्तरावरील आर्थिक व्यवहारांवर आणि बँक खात्यांवरही त्यांनी गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून राम मंदिराच्या निधीवरून संघावर सडकून टीका केली आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यपद्धतीवर आणि निधीवर बोलताना नाना पटोले म्हणाले की, "आज जागतिक पातळीवर आरएसएसच्या बाबत एक मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. जगभरातील तब्बल ३६ देशांमध्ये या संघटनेचे बँक खाते आहे. या खात्यांमध्ये अमाप पैसा जमा आहे. मात्र, हा पैसा नेमका कुठून येतो? तो कुणी दिलेला आहे? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या पैशांचे कोणतेही ऑडिट (लेखापरीक्षण) का होत नाही?" असे थेट सवाल त्यांनी उपस्थित केले.

अयोध्येतील राम मंदिराच्या मुद्द्यावरूनही पटोले यांनी संघाला लक्ष्य केले. ते म्हणाले, "राम मंदिर हे संपूर्ण देशाचे आणि सर्वांचेच श्रद्धेचे स्थान आहे. मात्र, या मंदिराच्या उभारणीत आणि निधीतही लूट करण्यात, त्यावर डाका टाकण्यात आरएसएसचा सहभाग आहे, आणि ही बाब आता कोणापासूनही लपलेली नाही."

अमेरिकेने संघाला दहशतवादी संघटना ठरवल्याच्या आपल्या दाव्याचा पुनरुच्चार करत पटोले यांनी स्पष्ट केले की, "जागतिक पातळीवर निर्माण झालेल्या या स्थितीमुळे अमेरिका आता या संघटनेबाबत नेमकी काय भूमिका (स्टँड) घेते, याकडे आमचे आणि सर्वांचेच बारकाईने लक्ष लागून आहे." पटोले यांच्या या खळबळजनक दाव्यामुळे आता राजकीय वर्तुळात मोठे वादळ निर्माण होण्याची शक्यता आहे.

## कर्जमाफीसाठी मंत्र्यांचे बंगले-गाड्यांचा लिलाव करू; २७ ऑगस्टला मुंबईत आंदोलन करण्याचा रविकांत तुपकर यांचा इशारा

बुलढाणा दि.२१ (प्रतिनिधी)- शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावरून शेतकरी नेते तथा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील त्रुटी आणि योजनेपासून वंचित शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारला आता थेट इशारा देत तुपकरांनी २७ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता मुंबईत आक्रमक आंदोलनाची घोषणा केली आहे. पुढील सात दिवसांत सरकारने मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर मंत्रालय परिसरातील मंत्र्यांचे बंगले आणि शासकीय वाहने जप्त करून त्यांचा प्रतिकात्मक जाहीर लिलाव करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

तुपकरांच्या या घोषणेमुळे शेतकरी कर्जमाफीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. जून महिन्यात अन्नत्याग आंदोलन, त्यानंतर मुंबईत विधानभवनासमोर सोयाबीन उधळणे, कापूस फेकणे तसेच क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी झाडावर चढून केलेले आंदोलन यामुळे सरकारचे लक्ष वेधले गेले होते. या आंदोलनानंतर तुपकर आणि त्यांच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठकही झाली होती. काही मागण्यांवर सकारात्मक चर्चा होऊन त्या मान्य करण्यात आल्या होत्या. मात्र तरीही कर्जमाफी योजनेतील अनेक प्रश्न कायम असल्याचे रविकांत तुपकर यांचे म्हणणे आहे.

कर्जमाफीच्या योजनेत थकीत कर्जदारांना दिलासा मिळत असताना नियमितपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येत असल्याने तुपकरांनी सरकारवर निशाणा साधला आहे. नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांऐवजी २ लाख रुपये प्रोत्साहन अनुदान देण्यात यावे, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. 'नियमित कर्ज भरून आम्ही गुन्हा केला आहे का?' असा सवाल उपस्थित करत नियमित कर्जदार शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे.

कर्जाचे पुनर्गठन झाल्यामुळे कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचाही योजनेत समावेश करावा, अशी मागणी तुपकरांनी केली आहे. अनेक शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय बँकांनी कर्जाचे पुनर्गठन केल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

दरम्यान, सरकारकडे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी, प्रोत्साहन अनुदानासाठी पैसे नसतील तर (पान ४ वर)

## बॅडमिंटन वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेत भारताचे पदक पक्के!

नवी दिल्ली दि.२१ (वृत्तसंस्था)- राजधानी दिल्लीत सुरू असलेल्या बॅडमिंटन वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेत भारताच्या त्रेसा जॉली आणि गायत्री गोपीचंद जोडीने महिला दुहेरी प्रकारात सेमीफायनलमध्ये आगेकूच केली. या वाटचालीसह या दोघीचं पदक पक्कं झालं आहे. ज्वाला गट्टा आणि अश्विनी पोनप्पा या जोडीने २०११ मध्ये या स्पर्धेत पदकावर नाव कोरलं होतं. त्यानंतर या स्पर्धेत महिला दुहेरी प्रकारात सेमीफायनलपर्यंत धडक मारणारी ही दुसरीच जोडी आहे.

## भाजपचा 'वन नेशन, वन पार्टी'चा छुपा डाव-हर्षवर्धन सपकाळ



पुणे दि.२१ (प्रतिनिधी)- स्वातंत्र्यलढ्यात ज्यांचा काडीचाही सहभाग नव्हता, त्यांनी आम्हाला देशभक्ती आणि वंदे मातरमचे धडे देऊ नयेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आधी स्वतःच्या शाखांमध्ये वंदे मातरम गाण्यास सुरुवात करावी, असे थेट आव्हान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले आहे. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या आगामी छात्रों की गुंज या कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी काँग्रेस नेत्यांनी पुण्यात पाहणी केली. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत सपकाळ यांनी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर सडकून टीका केली.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी राहुल गांधी यांनी छात्रों की गुंज हे देशव्यापी अभियान सुरू केले आहे. कोटा, डेहराडून आणि प्रयागराज येथील कार्यक्रमानंतर आता महाराष्ट्रात पुण्याच्या एसएसपीएम मैदानावर २२ ऑगस्ट रोजी हा कार्यक्रम पार पडणार आहे. राजमाता जिजाऊ आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कर्मभूमीत होणाऱ्या या कार्यक्रमाला तरुणांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याचे सपकाळ यांनी सांगितले. या पाहणी दौऱ्यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, सतेज ऊर्फ बंटी पाटील आणि रेहाना चिश्ती उपस्थित होते.

सध्याच्या शिक्षण व्यवस्थेवर आणि परीक्षांमधील गैरप्रकारांवर बोलताना सपकाळ म्हणाले की, २०१४ पासून केंद्रात सत्तेत असलेल्या भाजपने बहुजनांचे अधिकार हिरावून घेण्याचा सपाटा लावला आहे. व्यापम घोटाळ्यापासून ते अलीकडच्या नीट, टीईटी आणि न्यायालयातील भरती परीक्षांपर्यंत सर्वच परीक्षांना पेपरफुटीचे ग्रहण लागले आहे. (पान ४ वर)

# विद्यार्थ्यांनी मोबाइलचा अतिवापर टाळावा

मोबाइलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. ही त्यांच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून धोक्याची घंटा आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे सुजाण नागरिक आहेत. त्यामुळे त्यांनी मोबाइलचा अतिवापर टाळावा. आपल्याकडे अपेक्षेप्रमाणे मोबाइलच्या अतिवापरा संदर्भातील दुष्परिणामाबाबत जनजागृती होत नाही. ती होणे गरजेचे आहे.

पल्या लोकशाहीप्रधान भारत देशाचा १५ ऑगस्ट २०२५ रोजी ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहाने आणि विविध कार्यक्रमांनी साजरा झाला. म्हणजे आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे पूर्ण झाली. मात्र मोबाइलचा विचार करता वैज्ञानिक युगात वावरणारे आजचे विद्यार्थीवर्ग मोबाइलचा अतिवापर करताना दिसत आहेत. मोबाइलच्या अतिवापराम ुळे मुलांची विचार करण्याची शक्ती हळूहळू कमी होते. काही वेळा आपण काय करावे आणि काय नाही याची कल्पना मुलांना येत नाही. त्यात ते कधी कधी गोंधळून जातात. हे त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने घातक आहे. तेव्हा देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य वर्षापासून मोबाइलचा अतिवापर करणार नाही यासाठी केवळ विद्यार्थीच नव्हे तर आपण सर्वजणांनी आज वचनबद्ध होऊया.

मोबाइलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. ही त्यांच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून धोक्याची घंटा आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे सुजाण नागरिक आहेत त्यामुळे त्यांनी मोबाइलचा अतिवापर टाळावा. मोबाइलचा वापर आवश्यक कामासाठीच करण्यात यावा. सध्या तरी विद्यार्थ्यांना मोबाइलचे व्यसन लागले आहे. कायम त्यांच्या हातात मोबाइल दिसतो, तो दूर ठेवणे आवश्यक आहे. याचा परिणाम त्यांच्या डोळ्यांना त्रास होणे, झोप न लागणे, मानसिक दडपण, मन चलबिचल होणे, थोरांचे ऐकायचे नाही, मनमानी कारभार, मान व पाठ दुखी अशा अनेक समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. काही मुले तर झोपेत सुद्धा हातात मोबाइल धरून झोपतात. त्यात काही उशीच्या खाली लपवून मोबाइल ठेवतात. डॉक्टर सांगतात, आपण झोपताना मोबाइल दूर ठेवावा, याचे काय? तेव्हा देशातील सुजाण नागरिकांनी विचार करून उद्यापासून म्हणण्यापेक्षा आजपासून मोबाइलला दूर ठेवून योग्य ती काळजी घेतली पाहिजे. आजच्या युगात मोबाइल ही मूलभूत गरज झाली असली तरी त्याचा अतिवापर टाळावा. तेव्हा यात इतरांना दोष देण्यापेक्षा आई-वडिलांची भूमिका महत्त्वाची असते. मात्र हल्ली काही मुले आई-वडिलांचे ऐकत नाहीत.

तुम्हाला काय कळते? असा प्रती सवाल आपल्या आई-वडिलांना करतात. तेव्हा घरात भांडण नको म्हणून आई-वडील दुर्लक्ष करतात. अलीकडे तर मोबाइलचा विचार करता मोबाइलच्या अतिवापरामुळे मुलांची पुरेशी झोप होत नाही. म्हणजे कारण नसताना जागरण होते. हे जागरण आरोग्याला अपायकारक असते. याऐवजी एखादा खेळ खेळणे गरजेचे आहे. म्हणजे तेवढा ताण डोळ्यांवर येत नाही. म्हणूनच आवश्यक कामासाठी मोबाइलचा वापर करावा म्हणजे मोबाइलचा वापर कमी होईल किंवा मोबाइल वापरण्यावर मर्यादा येईल. ही आरोग्यासाठी चांगली बाब आहे. मी आवश्यक कामासाठी मोबाइलचा वापर करीन असे प्रत्येकांनी ठरविले पाहिजे. तसेच मोबाइलवर जास्त न बोलता आवश्यक तेवढेच बोलेन असे ठरवावे. त्यासाठी प्रत्येकांनी वेळेचे नियोजन करणे गरजेचे आहे. केवळ मोबाइलवर वेळ घालविण्यापेक्षा आपल्या कुटुंबीयांसमवेत व मित्रांसोबत काही वेळ गप्पागोष्टीत घालवावा. तेवढे मन मोकळे होते. महत्त्वाची बाब म्हणजे, अशांसोबत मनमोकळेपणाने वेळ घालवावा, यातूनच खरी ऊर्जा मिळते. आजच्या तरुणाईला अशा गप्पागोष्टींची गरज आहे. तेव्हा मोबाइलच्या वापरावर स्वत:हून निर्बंध घातले पाहिजेत. उदाहरणार्थ सकाळी चहा, नाश्ता, जेवण करताना मोबाइलवर बोलू नये. तसेच झोपल्यावर मोबाइल आपल्यापासून दूर ठेवावा. केवळ म ोबाइल एके मोबाइल नको तर आपल्याला मनोरंजनाकडे सुद्धा लक्ष द्यावे लागेल. मनोरंजनामुळे आपले मनोरंजन होत असते, त्याचप्रमाणे मन सुद्धा मोकळे झाल्याने कोणत्याही प्रकारचे दडपण येत नाही. तेवढा डोळ्यांना सुद्धा आराम मि ळतो. एखाद्या विषयावर एकमेकांशी सुसंवाद साधावा म्हणजे तेवढीच आपल्या ज्ञानात भर पडत असते. त्यात अधिक आराम हवा असेल तर काही काळ मोबाइल बंद करून ठेवल्यास अधिक चांगले. मात्र कामात अडथळा येणार नाही याची काळजी घ्यावी. काही वेळा आपल्या कुटुंबाचा सल्ला घ्यायला काहीच हरकत नाही. त्याचे पालन करणे आपल्या हातात आहे. चांगल्या सल्लूयामुळे आपले मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. कारण घरगुती सल्ला हा अनुभवातून व मोफत असतो, हे विसरता कामा नये.

मोबाइलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होऊ लागले आहेत. याचा सर्वात जास्त दुष्परिणाम डोळ्यांवर झालेला दिसून येत आहे. याचा परिणाम अतिवापर करणाऱ्या मोबाइलधारकांच्या शरीरावर होऊ लागला आहे. ही त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने चांगली गोष्ट नाही. तेव्हा मोबाइलच्या दुष्परिणामाविषयी जनजागृती होणे आवश्यक आहे. आपल्याकडे अपेक्षेप्रमाणे मोबाइलच्या अतिवापरा संदर्भातील दुष्परिणामाबाबत जनजागृती होत नाही. ती होणे गरजेचे आहे. यासाठी आरोग्य विभागाने व जागृत नागरिकांनी पुढे येऊन आवाज उठविला पाहिजे. ही विद्यार्थ्यांसाठी आजच्या काळाची गरज आहे. कारण भारत हा तरुणांचा देश आहे, असे आपल्या देशाचे माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे आपल्या भाषणात म्हणत असतात. तेव्हा देशातील तरुण तंदुरुस्त होण्यासाठी त्याला मोबाइलच्या अतिवापराच्या दृष्ट चक्रातून बाहेर काढावे लागेल. तसेच मुलांनी सुद्धा मोबाइलचे दुष्परिणाम लक्षात घेऊन सतर्क राहायला हवे. तेव्हा देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य वर्षांत सध्याच्या विद्यार्थ्यांना भविष्यात निरोगी जीवनशैली जगण्यासाठी आतापासून मोबाइलचा अतिवापर टाळण्यासाठी जागरूत करूया.

# स्वतंत्र पुर्वकाळात युवा पिढीने स्वतंत्र्यासाठी लढा दिला;आता जेन-झी हक्कासाठी लढत आहे,यात त्यांना राजकारण नको न्याय हवा!

**देशात** जेन-झी आपल्या हक्कांसाठी लढत आहे आणि सरकार व पक्ष-विपक्ष स्वार्थासाठी राजकारण करीत आहे. आता युवा पिढी कोणतेही राजकारण खपवून घेणाच्या तयारीत नाही.कारण त्यांची सहनशीलता संपली असून आरपारच्या लढाईत असल्याचे दिसून येते. जेन-झीवर होत असलेला अन्याय फक्त जंतरमंतर किंवा नीट किंवा झारखंड पुरता सिमीत रहाला नसून हा संपूर्ण देशभरातील जेन-झीवर होत असलेल्या अन्यायाविरूद्धचा मोठा लढा आहे.याची जाणीव सरकारने, पक्ष-विपक्षांनी व राजकारण्यांनी ठेवली पाहिजे.देशातील प्रत्येक राज्यात कोणत्या-ना-कोणत्या विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला दिसुन येतो याचे जिवंत उदाहरण देशाच्या १४५ कोटी जनतेच्या डोळ्यांपुढे आहे.त्यामुळे सर्वच राज्यातील भ्रष्ट नितीचा उलगडा करण्यासाठी प्रत्येक राज्यामध्ये तुकाराम मुंढे सारखे कर्तव्यनिष्ठ प्रशासकीय अधिकारी (मुख्य सचिवपदी) असने आवश्यक आहे आणि याचे स्वागत सर्वच स्तरातून होईल. कारण शिक्षण,आरोग्य,खानपान, महागाई, रोजगार या संपूर्ण ठिकाणी भ्रष्टाचाराची किड लागली आहे.या भ्रष्ट नितीचा नायनाट करण्यासाठी जेन-झीचा उदय झाला.आज जेन-झी जंतरमंतर पासून तर झारखंड पर्यंत आणि झारखंड पासून संपूर्ण देशात जेन-झी आपल्या हक्कांसाठी संपूर्ण शक्तीनिशी संघर्ष करीत आहेत.जंतरमंतर वर नीट पेपर फुटीसाठी आंदोलन झाले;तर झारखंडम ध्ये ढासळती शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी आंदोलन सुरू आहे.परंतु यात सर्व विद्यार्थांचा एक उद्देश आहे की,राज्यासह देशातील शिक्षण व्यवस्था पारदर्शक, स्वच्छ आणि सुरक्षित रहाली पाहिजे व विद्यार्थ्यांच्या परीश्रमाला आणि मेहनतीला यश यावे हाच उद्देश देशातील युवा पिढीचा आहे त्यासाठीच राज्यात किंवा देशात युवा पिढी आंदोलन करतांना दिसतात. आपण पहाले की, जंतरमंतरवर विद्यार्थ्यांचे तब्बल ३५ दिवस आंदोलन चालले यात सोनम वांगचूक यांनी २० दिवस उपोषण सुध्दा केले यानंतर विद्यार्थ्यांच्या आग्रहाखातर त्यांनी उपोषण मागे घेतले. आंदोलनादरम्यान लाठीचार्ज,पायलट गनचा वापर, बिहारमध्ये एके-४७ चा वापर अशा प्रकारे बळाचा वापर करण्यात आला व शेवटी धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला व ३६ व्या दिवशी जंतरमंतरवरील आंदोलन समाप्त झाले.या आंदोलनात संपूर्ण विपक्ष एकत्र झालेला आपण पाहिला.कारण केंद्र सरकारने सांगितले की, राजीनामा पध्दत आमच्या सरकारम ध्ये नाही.अशाप्रकारचे सत्तेचे घमंड केंद्र सरकारला असल्याने सरकार झुकायला तयार नव्हते.परंतु जेन-झी ची आक्रमकता व संपूर्ण एकवटलेला विपक्ष पाहून शेवटी धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला.यानंतर पंजाबमध्ये पेपर फुटीप्रकरण उघडकीस आले यात भाजपने पंजाब सरकारला घेरने सुरू केले व विरोधकांवय वार-प्रतीवार सुरू झाला. यानंतर विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला झारखंडमध्ये सुरुवात झाली.झारखंडमध्ये गैरभाजपा सरकार असल्याने झारखंडच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ भाजपा संपूर्ण शक्तीनिशी उतरला व याचे पडसाद लोकसभेत सुध्दा दिसून आले.त्यामुळे आता केंद्र सरकार विरोधकांना विचारत आहे की,आपण झारखंडच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या दरम्यान चुप का? असे अनेक प्रश्न झारखंडमधील विरोधी पक्ष भाजप व केंद्र सरकार , विरोधकांना व झारखंड सरकारला विचारत आहे. परंतु जंतरमंतरवरील आंदोलन असो अथवा पंजाब मधील आंदोलन असो अथवा झारखंडमधील विद्यार्थ्यांचे आंदोलन असो यावर तोडगा काढायला कोणीही तयार नाही. कारण केंद्र सरकारला ज्या राज्यात त्यांची सरकार नाही त्या राज्यात त्यांना राजकारण करायचे आहे;तर विरोधकांना भाजप शासीत प्रदेशात व केंद्र सरकारच्या विरूद्ध राजकारण करून आपापला हेतू साध्य करण्यासाठी लागले आहेत.अशा घाणेरड्या व घृणास्पद राजकारणामुळे युवा पिढीचे मोठ्या प्रमाणात भविष्याचे नुकसान होत आहे.याकरीता देशातील संपूर्ण राजकारण्यांनी (पक्ष-विपक्ष) यांनी एकत्र येऊन जेन-झी च्या मागण्यांवर गांभीर्याने विचार करायला पाहिजे.पक्ष-विपक्ष स्वतःच्या स्वार्थासाठी कितीही राजकारण करीत असले तरी आता जेन-झी थांबणार नसल्याचे दिसून येते.कारण जेन-झीचे आंदोलन जरी जंतरमंतरवरून सुरू झाले असले तरी त्याची ठिणगी येत्या काही दिवसांत संपूर्ण देशभर पसरण्याची दाट शक्यता असुन वनवा लागु शकते याला नाकारता येत नाही. कारण देशातील राजकीय प्रणालीने विद्यार्थ्यांच्या साधनांवर आणि आयुष्यावर घणाघाती प्रहार करून संपूर्ण तमाशा मांडला आहे. त्यामुळे नीट पेपर फुटी प्रकरणाच्या दरम्यान २२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या.स्वतंत्र पुर्वकाळात युवा वर्ग देशाला स्वातंत्र्य मिळावे यासाठी एकत्र झाला होता व आपल्या प्राणांची आहुती देऊन देश स्वतंत्र केला.परंतु आता स्वतंत्र भारताला पक्ष-विपक्षांच्या राजकारण्यांनी देशाला भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पोखरून टाकले असून अनेक गंभीर समस्या निर्माण केल्या आहेत.या भ्रष्ट व्यवस्थेपासुन देशाला मुक्ती मिळावी यासाठी जेन-झीचा उदय झाल्याचे दिसून येते.स्वतंत्र पुर्व काळात युवा पिढी स्वातंत्र्यासाठी लढले व आजचा युवा वर्ग आपल्या हक्कांसाठी लढत आहे.त्यामुळे जेन-झीचे वादळ आणि तुकारामांची सुनामी आता कोणीही रोखू शकत नाही. कारण जेन-झी सारखी तुकाराम मुंढे यांची आक्रमकता संपूर्ण देशभरात दिसायला लागली आहे.जंतरमंतरच्या आंदोलनाला विरोधकांचा साथ आणि झारखंडच्या आंदोलनाला एनडीएचा साथ असा भेदाभेद जेन-झी सोबत होत असल्याने आजचा युवा वर्ग सतर्क झाला आहे.कारण जेन-झीच्या लक्षात आले की,प्रत्येक पक्ष आपली राजकीय पोळी शेकण्याच्या तयारीत आहे.राजकीय पुढाऱ्यांनो लक्षात ठेवा आपल्या पुर्वजानी,थोर महात्मे, क्रांतिकारक अशा लाखो देशभक्तांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन देश स्वतंत्र केला. कारण त्यांचा एकच उद्देश होता की,भारत सुजलाम सुफलाम व्हावा व देशातील प्रत्येक नागरिकाला न्याय मिळावा.परंतु राजकीय पुढाऱ्यांनी सर्वत्र भ्रष्टाचाराचे बिज रोवले व त्यामुळे महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या,ढासळती शिक्षण प्रणाली, ढासळती आरोग्य सुविधा, करोडोंची दानचोरी,अन्नधान्य व दुग्धजन्य पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ अशा अनेक गोष्टींना वाव देऊन देशाचे वाटोळे केले असून भ्रष्टाचाराच्या बाबतीत भारताला अव्वल स्थानावर राजकीय पुढाऱ्यांनी नेऊन ठेवले व आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी वाममार्गाने पैसा कमवून करोडपती झाल्याचे दिसून येते व सर्वसामान्यांना गरीबीच्या खाईत गुदमरत आहे.याला प्रत्युत्तर म्हणून जेन-झी चा जन्म झाल्याचे दिसून येते आणि याचे पडसाद देशभरात दिसत आहे व काही काळात प्रत्येक राज्यात दिसून येईल.त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांनो सावधान आता तुमची खैर नाही.जय हिंद!

**– रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )

# पहिले राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. श्रीपाल सबनीस यांची एकमताने निवड



छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) – सामाजिक समता, वैज्ञानिक दृष्टिकोन, संविधानिक मूल्ये आणि परिवर्तनवादी विचारांची वैचारिक मशाल अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. ही घोषणा गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी सुभेदारी गेस्ट हाऊस, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत परिवर्तनवादी साहित्य संमेलन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आली.

रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी तापडिया नाट्य मंदिर, निराला बाजार, छत्रपती संभाजीनगर येथे हे एकदिवसीय साहित्य संमेलन उत्साहपूर्ण आणि वैचारिक वातावरणात संपन्न होणार आहे. महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार असून, उद्योजक ॲड. राम ेश्वर तायडे हे संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत.

हे संमेलन निळे प्रतीक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. संस्थेचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार रतन कुमार साळवे हे संम ेलनाचे मुख्य संयोजक आहेत.

परिवर्तनवादी साहित्याची समृद्ध परंपरा अधिक बळकट करणे, फुले-शाहू-आंबेडकर यांच्या समतावादी विचारांचा जागर करणे, संविधानिक लोकशाही, सामाजिक न्याय, बंधुता,



**मा. संजय शिरसाट**
उद्घाटक
सामाजिक न्याय मंत्री
महाराष्ट्र राज्य



**मा. डॉ. श्रीपाल सबनीस**
अध्यक्ष, पहिले राज्यस्तरीय
परिवर्तनवादी
साहित्य संमेलन



**ॲड. रामेश्वर तायडे**
स्वागताध्यक्ष, पहिले
राज्यस्तरीय परिवर्तनवादी
साहित्य संमेलन

स्त्री-पुरुष समानता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि वंचितांच्या प्रश्नांना साहित्याच्या माध्यमातून व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा या संमेलनाचा प्रमुख उद्देश असल्याचे संयोजन समितीने सांगितले.

साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजाच्या जडणघडणीचे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे परिवर्तनवादी साहित्यिक, कवी, विचारवंत, लेखक, संशोधक आणि सामाजिक कार्यकर्त्यांना एकत्र आणून वर्तमान सामाजिक वास्तवावर वैचारिक मंथन घडवून आणण्याचा प्रयत्न या संमेलनातून करण्यात येणार आहे. विविध परिसंवाद, वैचारिक सत्रे, साहित्यिक चर्चा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून परिवर्तनवादी विचारांची व्यापक मांडणी करण्यात येणार आहे.

संमेलनाच्या मुख्य संयोजन समितीमध्ये मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे, प्रा. शिवाजी वाठोरे, इंजि. राजधर दांडगे, डॉ. धनराज गोंडाने, भीम राव सरवदे, डॉ. यशवंत खडसे, प्रा. विजयकुमार गवई, ॲड. डी. व्ही. खिल्लारे, डॉ. संगीता अंभोरे, प्रा. डॉ. प्रज्ञा साळवे, डॉ. धोंडोपंत मानवतकर, डॉ. मधुकर दिवेकर, बाबुराव बनसोडे, गंगाताई सुरडकर, रत्नाकरभाई खंडागळे, विद्या साळवे, धम्मप्रिया खरात, कांचन सदाशिवे आणि श्रावण कोळनूरकर यांचा समावेश असून संमेलन यशस्वी करण्यासाठी ते परिश्रम घेत आहेत

परिवर्तनवादी साहित्याच्या चळवळीला नवे वैचारिक बळ देणारे आणि सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याला साहित्यिक अधिष्ठान देणारे हे संमेलन ठरेल, असा विश्वास संयोजन समितीने व्यक्त केला. पत्रकार परिषदेस संयोजन समितीचे पदाधिकारी, प्रा. शिवाजी वाठोरे, अँड. रामेश्वर तायडे, रतनकुमार साळवे, डॉ. धनराज गोंडाने, भीमराव सरवदे, अँड.डी. व्ही. खिल्लारे, रतनभाई खंडागळे, भीमराव गाडेकर, डॉ.म धुकर दिवेकर, कांचनताई सदाशिवे, रमेश वानखेडे आदी उपस्थित होते.

# विविध देशात राहून आपली संस्कृती परंपरा आणि देश प्रेम जागृत ठेवणारे नागरिक हीच आपली खरी ताकद – राजीव जहागीरदार



छत्रपती संभाजीनगर, दि. – २१ (प्रतिनिधी) – नेदरलँडमध्ये १५ ऑगस्ट ला ८० व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने झेंडावंदन कार्यक्रमात सहकुटुंब उपस्थित राहण्याची संधी मिळाली.

भारतापासून ७००० हजार किलोमीटर दूर नेदरलँडमध्ये राहूनही आपल्या भारतमातेचा स्वातंत्र्यदिन मोठ्या अभिमानाने साजरा झाला. हीच आपल्या संस्कृतीची, परंपरेची आणि देशप्रेम ाची खरी ताकद आहे.

आज परदेशात अनेक भारतीय राहत असले तरी त्याच्या मनात भारत कायम वसलेला आहे. आपल्या मुलांना भारतीय संस्कृती, मातृभाषा, सण-उत्सव आणि आपल्या परंपरांचा अभिमान शिकवणे ही आपली जबाबदारी आहे याची त्यांना जाणीव आहे.

भारताची ओळख फक्त त्याच्या भौगोलिक सीमांमुळे नाही, तर त्याची संस्कृती, विविधता आणि 'वसुधैव कुटुंबकम्' या महान विचारामुळे आहे.

आजचा भारत विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, उद्योग, शिक्षण आणि क्रीडा अशा प्रत्येक क्षेत्रात जगात आपले वेगळे स्थान निर्माण करत आहे. हा बदल आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे असे प्रतिपादन नेदरलँड मध्ये राहणाऱ्या भारतीयांनी केले.

कार्यक्रमाचे आयोजन नियोजन नेदरलँड मध्ये राहणारे श्री परागजी कुलकर्णी आणि श्री संजीव जी जैन यांनी केले.

# 'वारुँ फॉरएवर': श्रेया घोषाल आणि रोमीच्या आवाजात नव्या अंदाजात परतला 'मिर्झापूर'चा हिट ट्रॅक

'मिर्झापूर, दि. २१ (प्रतिनिधी) – द मूव्ही मधील लेटेस्ट गाणे 'वारुँ फॉरएवर' श्रेया घोषाल आणि रोमी यांना एका मंचावर आणते. हा ट्रॅक फ्रँचायझीच्या लोकप्रिय 'वारुँ' गाण्याचा नवा अंदाज सादर करतो. मूळ गाण्याची भावनिक ओळख कायम ठेवत त्याला एक नवी म्युझिकल ओळख देण्यात आली आहे.

या गाण्यात 'वारुँ'शी जोडलेली ओळखीची सोलफुल क्वालिटी कायम ठेवण्यात आली आहे, तर श्रेया घोषाल आणि रोमी यांच्या सहयोगामुळे ट्रॅकमध्ये एक नवा व्होकल डायनॅमिक पाहायला मिळतो. त्यांच्या आवाजांची जुगलबंदी गाण्याच्या सूफी-प्रेरित साउंडला उत्तम प्रकारे पूरक ठरते. त्यामुळे हा नवा व्हर्जन नॉस्टॅल्जिक वाटण्यासोबतच मूळ गाण्याच्या भावनेशीही जोडलेला आहे. गाण्याचे अरेंजमेंट 'वारुँ'ला संस्मरणीय बनवणारा मूळ गाभा कायम ठेवते आणि त्याचबरोबर 'मि र्झापूर: द मूव्ही'साठी ट्रॅकमध्ये नवी ऊर्जा आणते.

मूळ 'वारुँ' हे गाणे २०२० मध्ये रिलीज झाले होते आणि त्यानंतर ते 'मिर्झापूर' युनिव्हर्सचा अविभाज्य भाग बनले. आपल्या सोलफुल साउंड आणि लिरिक्समुळे हे गाणे चाहत्यांच्या ऑल-टाइम फेव्हरेट गाण्यांपैकी एक ठरले. 'वारुँ फॉरएवर'च्या माध्यमातून एक्सेल एंटरटेनमेंट आणि अमेझॉन चऋच स्टुडिओजने या लोकप्रिय गाण्याला नव्या म्युझिकल ट्रीटमेंटसह पुन्हा प्रेक्षकांसमोर आणले आहे. या गाण्यासाठी आनंद भास्कर कंपोजर म्हणून, तर गिन्निया दीवान लिरिसिस्ट म्हणून पुन्हा




सहभागी झाले आहेत, ज्यामुळे गाण्याची भावनिक ओळख आणि मूळ आत्मा कायम राहतो.

हा ट्रॅक एक्सेल म्युझिकच्या अंतर्गत रिलीज होणारा पहिला अल्बम रिलीजदेखील आहे, ज्यामुळे या फ्रँचायझीच्या म्युझिकल विश्वाचा आणखी विस्तार झाला आहे. 'मिर्झापूर: द मूव्ही'च्या ट्रेलर लॉन्चनंतर फ्रँचायझीच्या मोठ्या पडद्यावरील पदार्पणाबाबत चाहत्यांमध्ये उत्सुकता सातत्याने वाढत असतानाच हे गाणे प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे.

अमेझॉन चऋच स्टुडिओज आणि एक्सेल एंटरटेनमेंट प्रस्तुत 'मिर्झापूर: द मूव्ही'चे दिग्दर्शन गुरमीत सिंह यांनी केले असून, पटकथा पुनीत कृष्णा यांनी लिहिली आहे. एक्सेल एंटरटेनमेंटच्या बॅनरखाली रितेश सिधवानी आणि फरहान अख्तर यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. कासिम जगमगिया आणि विशाल रामचंद्रानी हे या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. 'मिर्झापूर: द मूव्ही' ४ सप्टेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# छत्रपती संभाजीनगर आकाशवाणी केंद्राचे कार्यक्रम दर्जेदार करणार- केंद्र निर्देशक सुमित बनसोडे



वैजापूर/संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) – पुढील वर्षी छत्रपती संभाजीनगर आकाशवाणी केंद्र आपल्या स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी(५० वर्ष) वर्ष साजरा करेल या निमित्ताने या आकाशवाणी केंद्राच्या कार्यक्रमात आमूलाग्र बदल करण्यात येऊन ते लोकाभिमुख व श्रोताभिमुख करण्याचे नियोजन आहे असे नूकतेच आकाशवाणी केंद्र निर्देशक म्हणून पदभार घेतलेले केंद्र संचालक सुमित बनसोडे यांनी गुरुवार रोजी श्रोता संमेलनात राज्यातून आलेल्या श्रोत्यांशी संवाद साधतांना केले. ते पुढे म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर हे ऐतिहासिक शहर आहे.

मराठवाडा विभागाचे मुख्यालय आहे, व येथून जवळच जगप्रसिद्ध वेरूळ व अजिंठा लेणी,तसेच दौलताबाद किल्ला, बिविका मकबरा,नाथ सागर, एकनाथ महाराज समाधी स्थळ,व वेरूळ येथील घृष्णेश्वर मंदिर आहे हा वारसा जपण्यासाठी सुद्धा आकाशवाणी पुढाकार घेऊन कार्यक्रम नियोजन करेल असेही पुढे ते म्हणाले. त्यांनी श्रोत्यांशी संवाद साधून त्यांच्या सूचना, मागण्याची नोंद करुन घेतल्या या प्रसंगी व्यासपीठावर त्यांच्या समवेत वृत्तपत्र निवेदक समरजितसिंग ठाकूर, तसेच मराठवाडा विभागाचे जेष्ठ साहित्यीक व जेष्ठ रेडिओ श्रोते ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात संभाजीनगर आकाशवाणी केंद्राचे सेवानिवृत्त कार्यक्रम अधिकारी उन्मेष वाळिंबे, आकाशवाणी अभियंता श्रीमती वंदना ठाकूर, संदीप अहिरराव, सेवानिवृत्त अभियंता अरुण ठाकूर, वृत्तपत्र विभागाचे हर्षवर्धन दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती.

संमेलन आयोजिका अंजली खंडाळीकर व आयोजन समिती सदस्य व राज्यातील श्रोते मोठया संख्येने उपस्थित होते.

# करोडोंच्या गुटखा-पान मसाल्याच्या जाहिरातींकडे सनी देओलने फिरवली पाठ; म्हणाला, माझी सद्सद्विवेकबुद्धी मला परवानगी देत नाही

बॉलिवूडमधील ढाई किलो का हाथ या डायलॉगमुळे प्रसिद्ध झालेला, अभिनेता सनी देओलने गुटखा आणि पान मसाल्याच्या जाहिराती करण्यास स्पष्टपणे नकार दिल्याचे नुकतेच सांगितले आहे. अशा जाहिरातींच्या अनेक ऑफर्स आपल्याला आल्याचे सांगत, केवळ पैशांसाठी आपल्या तत्त्वांशी तडजोड करायची नसल्याचे सनी देओलने स्पष्ट केले. एका पॉडकास्टमध्ये बोलताना सनी म्हणाला की, 'मी पान मसाल्याची जाहिरात करत नाही आणि कधीही करणार नाही. मी गुटख्यासारख्या



गोष्टींचा प्रचार करणार नाही. मला ऑफर्स येतात, पण मी करणार नाही.' ज्या गोष्टींवर आपला विश्वास नाही, त्यांचा प्रचार करणे योग्य वाटत नसल्याचेही त्याने सांगितले.

ताज्या बातम्यांचे अपडेट्स मिळवणे – एबीपी न्यूज ने दिलेल्या वृत्तानुसार सनी देओलच्या मते, एखाद्या जाहिरातीसाठी मोठी रक्कम मिळत असली तरी मनाची तयारी नसेल, तर ती ऑफर स्वीकारण्यात अर्थ नाही. मी पैशांसाठी काही करण्याचा प्रयत्न केला, तरी माझे मन मला मागे खेचते. मी हे का करत आहे? मी हे कोणासाठी करत आहे? मला हे फक्त पैशांसाठी करायचे आहे का? असे प्रश्न स्वतःला विचारल्यानंतर त्या निर्णयापासून मागे हटतो, असे त्याने सांगितले.

सनी देओलने पुढे म्हटले की, आयुष्यात प्रत्येक गोष्ट केवळ पैशांसाठी करण्याचा त्याचा दृष्टिकोन नाही. काही निर्णय घेताना आपली सद्सद्विवेकबुद्धी आणि मूल्ये महत्त्वाची असल्याचे त्याने स्पष्ट केले. त्यामुळेच गुटखा किंवा पान मसाल्यासारख्या उत्पादनांच्या जाहिरातींच्या आकर्षक ऑफर्स असूनही त्याने त्या स्वीकारल्या नाहीत.

दरम्यान, सनी देओलच्या या वक्तव्याची चर्चा अशा वेळी होत आहे, जेव्हा पान मसाल्याच्या जाहिरातींवरून बॉलिवूडमधील काही मोठ्या कलाकारांवर महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाची कारवाई झाली आहे. शाहरुख खान, अजय देवगण आणि टायगर श्रॉफ यांना विमनल वेलचीच्या जाहिरातीसंदर्भात कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. या जाहिरातीमधून प्रतिबंधित पान मसाला उत्पादनाचा अप्रत्यक्ष किंवा 'सरोगेट' प्रचार होत असल्याचा FDAचा आक्षेप आहे.

# लॉर्ड मेकॉलेंच्या शिक्षण पद्धतीने भारताला दिर्घकालीन गुलाम बनवले

## निवृत्त मुख्याध्यापक प्रकाश सोनवणे यांच्या सेवा गौरव समारंभ प्रसंगी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे प्रतिपादन







छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) – ब्रिटिश अधिकारी लॉर्ड थॉमस मेकॉले यांनी २ फेब्रुवारी १८३५ रोजी भारतात पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीचा पाया रचला. त्यांनी मेकॉले मिनिट्स अर्थात भारतीय शिक्षणावरील अहवाल ब्रिटिश सरकारला दिला होता. त्यात भारतीय जनतेला दिर्घकालीन गुलाम बनवण्यासाठीचे प्रयोजन होते. म्हणूनच आपण गुलाम राहिलो सुद्धा. मेकॉले मिनिट्सचा पाडाव करून खऱ्या अर्थाने आता भारतीय इतिहास सांगणारी शिक्षण पद्धती आपण अमलात आणली आहे. शिक्षकांनी आता आहोरात्र परिश्रम करून भारताची संस्कृती अनब इतिहास समाजाच्या तळागाळात पोहचवण्याचे काम करावे. प्रकाश सोनवणे यांच्या कार्याची दखल जशी समाजाने घेतली, तशीच दखल प्रत्येक शिक्षकांची घेतली जावे. असे काम करून दाखवणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी गुरूवारी (२० ऑगस्ट) व्यक्त केले.

ज्ञानसंदीप शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रकाश सोनवणेंचा बागडे यांच्या हस्ते सपत्निक सेवागौरव करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. मंचावर सामाजिक न्यायमंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट, बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, शिक्षक आमदार विक्रम काळे, महापौर समीर राजूरकर, संगीता खिल्लारे, ज्येष्ठ विधिज्ज्ञ मिलिंद जोशी, ज्येष्ठ पत्रकार डॉ. शेखर मगर, एकनाथ पाखरे, अल्पसंख्याक शिक्षण संस्थाचालक संघटनेचे महासचिव नबी पटेल, आंबेडकरनगरच्या नगरसेविका भारती सोनवणे, किशोर नागरे आदींची मंचावर उपस्थिती होती. बागडे म्हणाले, 'शिक्षकांनी कायम समाजात नवा आदर्श पेरणे गरजेचे असते. शिक्षक समाजाला दिशा देण्याचे काम करत असतो. प्रकाश सोनवणे यांनीही त्यांच्या हयातीत गरीब, श्रमिक, कष्टकऱ्यांच्या पाल्यांना ज्ञानी करण्याचे काम केले. ज्ञान इतरांना दिल्याने कमी होत नसते उलट वाढत असते. त्यामुळेच ते सदोदितपणे देत रहावे.' असे आवाहनही बागडे यांनी केले. अतुल सावे म्हणाले, ' संस्था काढणे सोपे आहे. पण संस्था उपेक्षित-वंचितांच्या कल्याणासाठी उपयोगी आणण्याचे काम अवघड आहे. असेच अवघड काम करणाऱ्यांचा समाज दखल घेतो. सोनवणे सरांचीही समाजाने दखल घेऊन त्यांचा गौरव केला आहे.' शिरसाट म्हणाले, 'समाजाने स्वत:हून एखाद्याचा गौरव करण्याची संधी खूप कमी लोकांच्या वाट्याला येते. त्यात सोनवणे सरांच्या वाट्याला ती आली. त्यांच्या कार्याची त्यांना पावती मिळाली.' विक्रम काळे म्हणाले, ' विद्यार्थ्यांच्या जीवनातील अंधार दुर करण्याचे काम शिक्षक करत असतो. अंधारावर प्रकाशाने मात करता येते. अशीच मात प्रकाश सोनवणे यांनी केली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनात नवे नंदनवन फुलवले आहे.' प्रकाश सोनवणे सत्काराला उत्तर देताना भावनाविवश झाले होते. प्रारंभी ज्येष्ठ पत्रकार डॉ. शेखर मगर यांनी संपादीत केलेल्या 'प्रकाश सोनवणे; वंचितांचा ज्ञानदीप' या गौरव ग्रंथाचेही प्रकाशन करण्यात आले. डॉ. शेखर मगर यांनी प्रास्ताविक केले. माजी नगरसेवक गौतम लांडगे, ज्ञानेश्वर ढाकणे, सुनील खंडागळे, बी.बी. शिंदे, मिलिंद जोशी, नबी पटेल यांनी मनोगत व्यक्त केले. संदीप ढाकणे यांनी सूत्रसंचालन केले. एकनाथ पाखरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अशोक कांबळे, प्रा. विलास पांडे, संदीप सोनवणे, अभिजीत सोनवणे, किरणकुमार सोनवणे यांनी प्रयत्न केले.

### मनपाच्या शाळांसाठी शिक्षणतज्ज्ञांची समिती करणार-महापौर

महापौर समीर राजूरकर म्हणाले, ' मनपाच्या शाळेत गरीबांचे मुले शिकतात. तिथे पायाभूत सुविधांचा आभाव आहे. पण ज्या शाळांमध्ये चांगल्या सुविधा आहे. तिथे विद्यार्थी आपले कौशल्य दाखवतातच. मनपा शाळेचा एका विद्यार्थ्याने नीटमध्ये ७२० पैकी ६८५ गुण घेतले. आता मनपा शाळांचा पुर्नविकास करण्यासाठी शहरातील शिक्षण तज्ज्ञांची समिती केली जाणार आहे. त्यामध्ये २५ पेक्षा अधिक शिक्षण तज्ज्ञ काम करतील. त्यांनी केलेल्या शिफारसींना मनपा प्रशासन तातडीने लागू करेल. '

# पैठण गेट परिसरात पाणी वाया घालविल्याप्रकरणी नागरिकाला १० हजार रुपयांचा दंड



संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) – शहरातील पाण्याची परिस्थिती लक्षात घेता उपलब्ध पाण्याचा काटकसरीने आणि जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. पिण्याच्या पाण्याचा अपव्यय करणाऱ्या नागरिकांविरुद्ध आता कडक दंडात्मक कारवाई करण्यात येणार असून, त्याची सुरुवात आज पैठण गेट परिसरातून करण्यात आली.

आज सकाळी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे आणि उपआयुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख नंदकिशोर भोंबे यांच्या निदर्शनास पैठण गेट परिसरात एका नागरिकाकडून मोठ्या प्रमाणात नळाचे पाणी वाया घालविले जात असल्याचे आले. संबंधित नागरिक निलेश देशमुख यांनी घरातील पाण्याची टाकी भरल्यानंतरही नळाचे पाणी बंद न करता ते रस्त्यावर सोडले होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्याचे निदर्शनास आले.

या प्रकाराची गंभीर दखल घेत आयुक्त अमोल येडगे यांनी संबंधित नागरिकावर १० हजार रुपयांचा दंड आकारण्याचे निर्देश दिले. पाण्यासारख्या अत्यंत मौल्यवान नैसर्गिक संसाधनाचा अशा पद्धतीने अपव्यय करणे योग्य नसून, नागरिकांनी पाणी वापरताना अधिक जबाबदारीने वागणे आवश्यक असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

**पाणी वाया घालविण्याचे प्रकार टाळण्याचे आवाहन**

महापालिकेच्या पाणीपुरवठ्याचे पाणी घरगुती वापरासाठी आवश्यकतेपेक्षा अधिक घेणे, पाण्याच्या टाक्या भरल्यानंतर नळ सुरू ठेवणे, टाकीतून ओव्हरफ्लो होणारे पाणी रस्त्यावर वाहू देणे, घरासमोरील रस्ते किंवा परिसर धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करणे, वाहन धुताना मोठ्या प्रमाणात पाणी वापरणे, नळ किंवा पाइपलाइनमधून होणारी गळती वेळेत दुरुस्त न करणे तसेच सार्वजनिक ठिकाणी नळ सुरू ठेवणे, अशा प्रकारे पाण्याचा अपव्यय करणे टाळावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

विशेषतः पाण्याच्या टाक्या भरल्यानंतरही पाणी रस्त्यावर वाहत राहणे हा पाण्याचा गंभीर अपव्यय असून, अशा प्रकारांकडे नागरिकांनीही गांभीर्याने पाहावे. आपल्या घरातील नळ, टाक्या आणि पाणीपुरवठ्याच्या जोडण्यांमध्ये गळती असल्यास ती तातडीने दुरुस्त करावी, असेही महापालिकेने स्पष्ट केले आहे.

**अपव्यय आढळल्यास कडक कारवाई**

शहरात कोणत्याही नागरिकाकडून पाणी रस्त्यावर सोडणे अथवा कोणत्याही स्वरूपात पाण्याचा अपव्यय होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांविरुद्ध कडक दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा आयुक्त अमोल येडगे यांनी दिला आहे. नागरिकांनी पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरावा, अनावश्यक पाणी वापर टाळावा आणि महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त अमोल येडगे यांनी केले आहे.

# महावितरणच्या शिबिरांत ३३१ ग्राहकांचे 'समाधान'

छत्रपती संभाजीनगर : वीज ग्राहकांच्या समस्या आणि तक्रारींचे स्थानिक पातळीवर तातडीने निराकरण व्हावे तसेच ग्राहकांना विविध सेवा व योजनांची माहिती मिळावी यासाठी महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर शहर मंडलातर्फे आयोजित ग्राहक समाधान शिबिरांत ३३१ तक्रारींचा निपटारा करण्यात आला.




शहर विभाग-१ अंतर्गत छावणी उपविभागात १४५ तर पॉवर हाऊस उपविभागात ६५ तक्रारी प्राप्त झाल्या. शहर विभाग-२ अंतर्गत गारखेडा उपविभागात ९४ तर चिकलठाणा उपविभागात २५ तक्रारी प्राप्त झाल्या. शिबिरांमध्ये वीजबिलातील तक्रारी, नवीन वीजजोडणी संबंधित समस्या तसेच महावितरणच्या विविध सेवांबाबत प्राप्त सर्व ३३१ तक्रारींचे निराकरण करण्यात आले. यासोबतच सध्या ग्राहकांमध्ये स्मार्ट मीटरबाबत असलेले गैरसमज व संभ्रम दूर करून, स्मार्ट मीटरची कार्यपद्धती आणि फायदे याबाबतही माहिती देण्यात आली.


# माजी सैनिकांच्या पाल्यांसाठी पंतप्रधान शिष्यवृत्ती योजना; ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी)– माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा तसेच युद्ध विधवांच्या पात्र पाल्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता पंतप्रधान शिष्यवृत्ती योजना (झचडड) अंतर्गत ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

पात्र पाल्यांनी दि. ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी केंद्रीय सैनिक बोर्डाच्या www.ksb.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरावा. संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या चेकलिस्टनुसार आवश्यक कागदपत्रांसह अर्ज निर्धारित मुदतीत सादर करणे आवश्यक आहे. पंतप्रधान शिष्यवृत्ती योजनेसंदर्भात अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे दूरध्वनी क्रमांक ०२४०-२३७०३१३ वर संपर्क साधावा. पात्र माजी सैनिकांच्या पाल्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# कचनेर क्षेत्रात भव्य दिगंबर जैन मंदिराचा प. पु. दिगंबराचार्य चर्याशिरोमणी पट्टाचार्य श्री १०८ विशुद्ध सागरजी महाराज यांच्या आशीर्वादाने व प्रेरणाने शिलान्यास २६ ऑगस्टला

छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) – दिगंबर जैन समाजाचे सुप्रसिद्ध 'दक्षिणेचे महावीरजी' श्री १००८ चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र, कचनेरजी येथे धर्म आणि आस्थेशी संबंधित एक नवा ऐतिहासिक अध्याय सुरू होणार आहे. क्षेत्रावर देवाधिदेव श्री १००८ चिंतामणी पार्श्वनाथ भगवान यांच्या नवीन भव्य मंदिराच्या बांधकामाचा शुभारंभ आगामी २६ ऑगस्ट २०२६, बुधवार रोजी भव्य शिलान्यास सोहळ्याने करण्यात येणार आहे. या निमित्ताने क्षेत्रावर विविध धार्मिक अनुष्ठानांसह शिला स्थापना सोहळा आयोजित करण्यात आला असून, या ऐतिहासिक सोहळ्याबद्दल सकल जैन समाजामध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



**खंडित मूर्ती स्वतः जोडली गेल्याचा अद्भुत अतिशय** – अशी माहिती क्षेत्राचे विश्वस्त मंडलाचे अध्यक्ष सुरेश कासलीवाल व्यवस्थापकीय संचालक भरत ठोले उपाध्यक्ष संजय कासलीवाल कार्यकारी मंडलाचे अध्यक्ष सुनील पाटणी सचिव निलेश काला उपाध्यक्ष हेमंत बाकलीवाल जयकुमार बाकलीवाल व विश्वस्त व कार्यकारी मंडल यांनी सांगितले की, कचनेरजी अतिशय क्षेत्राची विशेष ओळख म्हणजे भगवान श्री १००८ चिंतामणी पार्श्वनाथ यांची अतिशयकारी मूलनायक मूर्ती. मान्यतेनुसार, खंडित झाल्यानंतर ही मूर्ती स्वतःहून जोडली गेली. या अद्भुत अतिशयामुळे कचनेरजी हे देशभरातील भाविकांच्या श्रद्धेचे प्रमुख केंद्र बनले आहे. भगवानांच्या दर्शनासाठी व पूजाअर्चनेसाठी दूरदूरहून भाविक येथे येतात. अनेक भाविक पायी यात्रेद्वारेही कचनेरजी येथे पोहोचून भगवानांच्या चरणी आपली श्रद्धा अर्पण करतात. भाविकांच्या श्रद्धेनुसार कचनेरजी हे संकटमोचक आणि मनोकामना पूर्ण करणारे अतिशय क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे.

**२६ ऑगस्टला मांगलिक धार्मिक कार्यक्रम** – प्रतिष्ठाचार्य श्री चंद्रकांत गुंडप्पा पंडित (इंडी) यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली शिलान्यास सोहळ्याच्या विविध धार्मिक क्रिया संपन्न होणार आहेत.

**कार्यक्रम पुढीलप्रमाणे–** सकाळी ५ वाजता : मांगलिक विधान, भूमिशुद्धी व शिलाशुद्धी विधान. सकाळी ८ वाजता : मुख्य शिलान्यास सोहळा व शिला स्थापना. सकाळी १०.३० वाजता : महाप्रसादी व वात्सल्य भोज.

**पुण्यार्जनाची विशेष संधी** – भव्य मंदिराच्या या पुण्यकारी निर्माणकार्यात सहभागी होऊन भाविकांना शिला स्थापनेच्या माध्यमातून पुण्यार्जन करण्याची विशेष संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**कासलीवाल परिवार शिलान्यासाचा पुण्यार्जक** – मंदिराच्या शिलान्यासाचे प्रमुख पुण्यार्जक म्हणून स्व. डॉ. सुगनचंदजी केवलचंदजी कासलीवाल यांच्या पावन स्मृतीप्रित्यर्थ, श्रीमती मंगलादेवी यांच्या प्रेरणेने धर्मानुरागी श्री संजयजी व सौ. मेघाजी कासलीवाल तसेच समस्त कासलीवाल परिवारङ्खआडुळवाला (कासलीवाल कन्स्ट्रक्शन), छत्रपती संभाजीनगर यांनी हा पुण्यलाभ घेतला आहे. तसेच स्व. श्री मोतीलालजी व प्रकाशचंदजी पहाडे यांच्या पावन स्मृतीप्रित्यर्थ, श्रीमती प्रतिभाजी यांच्या प्रेरणेने धर्मानुरागी श्रीमान अभिजीतजी-सौ. श्रुतीजी, श्रीमान अंकितजी-सौ. प्रज्ञाजी, श्रीमान सौरभजी-सौ. प्रियंकाजी, चि. अर्णव, चि. आदित, चि. चिरायु, चि. आरव, कु. अजिता व समस्त पहाडे परिवार (कौलाना वाले), मालेगाव यांच्याकडून महाप्रसादीचा पुण्यलाभ घेण्यात येणार आहे.

**घरबसल्या पाहता येणार शिलान्यास सोहळ्याचे थेट प्रक्षेपण** – जे भाविक काही कारणास्तव कचनेरजी येथे उपस्थित राहू शकणार नाहीत, त्यांच्यासाठी मंदिर प्रशासनाच्या वतीने शिलान्यास सोहळ्याचे थेट प्रक्षेपण (Live) करण्यात येणार आहे. 'चिंतामणी दर्शन Live Stream' या YouTube चॅनेलच्या माध्यमातून भाविकांना घरबसल्या शिलान्यास सोहळ्याचे दर्शन व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेता येणार आहे.

**सपरिवार उपस्थित राहून धर्मलाभ घेण्याचे आवाहन–** विश्वस्त, कार्यकारिणी मंडळ तसेच कचनेरजी येथील समस्त ग्रामस्थांच्या वतीने सकल जैन समाज आणि धर्मानुरागी भाविकांना आवाहन करण्यात आले आहे की, मंदिर निर्माणाच्या या ऐतिहासिक व पुण्यकारी प्रसंगी मोठ्या संख्येने सपरिवार कचनेरजी येथे उपस्थित राहून शिलान्यास सोहळ्यात सहभागी व्हावे आणि धर्मलाभ घ्यावा. कचनेरजीच्या पावन भूमीवर होणारा हा ऐतिहासिक शिलान्यास सोहळा भावी पिढ्यांसाठी आस्था, संस्कृती आणि धर्मसंरक्षणाची प्रेरणादायी स्मृती ठरणार आहे.अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल औरंगाबाद यानी दिली आहे.

# शनिवार, २२ रोजी युवाभारत स्टुडंट फोरम प्रस्तुत युवा संमेलन

छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) – चला ज्ञानाला राष्ट्रसेवेची दिशा देऊया! चला युवा शक्तीला राष्ट्रनिर्मितीची ऊर्जा देऊया! या संकल्पनेतून शनिवार, २२ रोजी युवाभारत स्टुडंट फोरम प्रस्तुत युवा संमेलनाचे आयोजन केले आहे. सायंकाळी ६ ते रात्री ८ वाजेदरम्यान विवेकानंद महाविद्यालय समर्थनगर येथे

होणाऱ्या कार्यक्रमास प्रमुख वक्ते डीआरडीओचे वरिष्ठ शास्त्रज्ञ काशिनाथ देवधर, प्रमुख अतिथी वामनराव देशपांडे म्हणून उपस्थित राहणार आहे.

ज्या राष्ट्राची सुरक्षा स्वतःच्या सामर्थ्यावर उभी असते, ते राष्ट्रच खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर आणि सामर्थ्यवान बनते. भारताने स्वदेशी संशोधन, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या बळावर संरक्षण क्षेत्रात घेतलेली झेप आज जगाचे लक्ष वेधून घेत आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानापासून ते स्वदेशी संरक्षण प्रणालींपर्यंतचा हा प्रवास म्हणजे आत्मनिर्भर भारताच्या सामर्थ्याची गगनभरारी होय. या युवा संमेलनात संरक्षण संशोधन आणि विकास क्षेत्रातील डीआरडीओचे शास्त्रज्ञ आपल्या अनुभवातून उलगडणार आहेत भारताच्या स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञानामागची वैज्ञानिक वाटचाल, आव्हाने, संधी आणि भविष्यातील दिशा आहे. विज्ञानाती जिज्ञासा, संशोधनाती दृष्टी आणि सष्ट्रसुरक्षेची जबाबदारी यांचा संगम अनुभवण्यासाठी सज्ज व्हा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमासाठी रोहित पांडव ९५६१५५०४२४ यांना संपर्क साधावा.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# आत्महत्या करणाऱ्या मुलाला वाचवताना वडिलांचा मृत्यू; धक्का बसलेल्या आईनेही मारली उडी

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर शहरात आज एक अंगावर काटा आणणारी घटना उघडकीस आली आहे. आत्महत्या करण्याच्या उद्देशाने डोंगरावर गेलेल्या १८ वर्षीय मुलाला वाचवण्याच्या प्रयत्नात त्याच्या वडिलांचा दरीत कोसळून मृत्यू झाला. तर, आपल्या डोळ्यांदेखत नवरा आणि मुलाचा झालेला करुण अंत पाहून तीव्र धक्का बसलेल्या आईनेही त्याच डोंगरावरून उडी मारून जीवन संपवले. एकाच कुटुंबातील तिघांचा असा दुर्दैवी अंत झाल्याने संपूर्ण संभाजीनगर जिल्हा हादरला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी तिसगाव परिसरातील खवड्या डोंगरावर हा थरार घडला. देवळाई-सातारा परिसरात राहणारा १८ वर्षीय कुणाल मुरलीधर चांदवडे हा तरुण आत्महत्या करण्यासाठी या डोंगरावर गेला होता. याबाबतची माहिती मिळताच त्याचे वडील मुरलीधर चांदवडे, आई संगीता चांदवडे आणि परिसरातील काही नागरिकांनी त्याला वाचवण्यासाठी तातडीने डोंगराकडे धाव घेतली.

डोंगराच्या अगदी कड्यावर उभा असलेला मुलगा कोणाचेही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. त्याचे वडील आणि उपस्थित नागरिक त्याची समजूत काढण्याचा आटोकाट प्रयत्न करत होते. 'उडी मारू नकोस', असे त्याला विनवत होते. याच दरम्यान, वडिलांनी पुढे झेप घेत मुलाला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, दुर्दैवाने त्याच क्षणी मुलाने खाली उडी घेतली आणि त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात वडिलांचाही तोल गेला. दोघेही शेकडो फूट खोल दरीत कोसळले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

आपल्या डोळ्यांसमोर अवघ्या काही सेकंदांत संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाल्याचे पाहून कुणालची आई संगीता चांदवडे यांना तीव्र मानसिक धक्का बसला. नवरा आणि मुलाच्या मृत्यूचा शोक अनावर झाल्याने त्यांनीही क्षणार्धात त्याच डोंगरावरून दरीत उडी घेतली.

या घटनेत त्यांचाही मृत्यू झाला. उपस्थित लोकांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला, मात्र तोवर उशीर झाला होता.

या घटनेमुळे घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांना मोठा धक्का बसला आहे. कुणालने इतक्या टोकाचे पाऊल का उचलले आणि आत्महत्येचा प्रयत्न का केला? याचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. या हृदयद्रावक घटनेमुळे सातारा-देवळाई परिसरासह संपूर्ण शहरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

# 'माती आणि पाण्या'साठी चालले हजारो; महावॉकेथॉन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद




छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीदिनी साजरा करण्यात येणाऱ्या जलसंधारण दिनानिमित्त आज महावॉकेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. क्रांती चौक ते महात्मा फुले पुतळा या दरम्यान झालेल्या या जनजागृती पदयात्रेत हजारो नागरिकांनी सहभाग घेतला. पाणी आणि माती संवर्धनाच्या जनजागृतीसाठी काढलेल्या या पदयात्रेने लोकांचे लक्ष वेधले.

शासनाच्या मृद व जलसंधारण विभागामार्फत दि.१५ पासून मृद व जलसंधारणाबाबत जनजागृती सुरु आहे. माती आणि पाण्याच्या संधारणाचे महत्त्व यानिमित्ताने जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. याच उपक्रमाचा भाग म्हणून आज शहरात 'महावॉकेथॉन- वॉक फॉर वॉटर' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

विधान परिषद सदस्य आ. सुहास शिरसाट, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष जितेंद्र जयस्वाल, समाज कल्याण सभापती बालाजी सोनटक्के, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम, मनपा आयुक्त अमोल येडगे, वाल्मीचे महासंचालक सुनिल कुशिरे, कार्यकारी अभियंता नरेंद्र कटके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, कार्यकारी अभियंता सिंचन विजय बिडगर, उपशिक्षणाधिकारी गीता तांदळे, उप अभियंता विजय कांबळे तसेच सर्व विभागप्रमुख, क्रीडा प्रेमी नागरिक , महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी मृद व जलसंधारणाची शपथ घेण्यात आली. त्यानंतर क्रांती चौकापासून हा पदयात्रेची सुरुवात झाली. तेथून पैठण गेट – तिलकपथ रोड मार्गे डावीकडे – पोलीस चौकी – गुलमंडी –महात्मा फुले पुतळा ते जिल्हा परिषद मैदान येथे या यात्रेचा समारोप झाला. तेथे माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच शपथ देण्यात आली. समारोपाच्या ठिकाणी विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण आ. सुहास शिरसाट व अन्य मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या वॉकेथॉन स्पर्धेत सोडतद्वारे घोषित करण्यात आलेल्या विजेत्यांची नावे याप्रमाणे- नंदिनी अशोक साळवे, मोहन कारभारी आखाडे, सचिन सुभाष जाधव,निखिल तुळशीराम पठाडे,संदिप भरत गिरी, समृद्धी रमेश बागुल,अनिता सुरेश खेळकर. सर्व विजेत्यांच्या मान्यवरांच्या हस्ते पारितोषित वितरण करण्यात आले.

# देशात संगणक युगाची सुरुवात करण्यासाठी स्व.राजीव गांधी यांचे मोलाचे योगदान-प्रा.प्रशांत माठे

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- भारतात तंत्र युगाची म्हणजेच संगणक युगाची सुरुवात माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांनी केली म्हणून आधुनिक युगात त्यांचे मोलाचे योगदान आहे असे प्रतिपादन प्राध्यापक प्रशांत माटे यांनी केले करमाड येथील राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या सद्भावना दिन कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते




सद्भावना ही केवळ एका दिवसापूर्वी मर्यादित न राहता ती प्रत्येकाच्या आचार विचारांचा अविभाज्य भाग झाली पाहिजे समाजात जात धर्मभाषा प्रांत किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारावर भेदभाव न करता प्रत्येक व्यक्तीच्या सन्मान करणे हीच खरी सद्भावना आहे विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनापासूनच सामाजिक समता सहिष्णुता आणि बंधू भावाची मूल्ये आत्मसात करावीत असे ते म्हणाले

राष्ट्रीय एकात्मता ही केवळ घोषणा मधून निर्माण होत नाही तर ती आपल्या दैनंदिन वर्तनातून आणि परस्परांशी असलेल्या व्यवहारातून निर्माण होते दुसऱ्यांच्या मताचा आदर करणे, गरजू व्यक्तीला मदतीचा हात देणे, भेदभावाला विरोध करणे आणि समाजातील सर्व घटकांना समानतेने वागणूक देणे हीच खरी सद्भावनेची ओळख आहे असे प्राध्यापक माठे यांनी म्हटले.

या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राध्यापक डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी सद्भावना दिनाचे सामाजिक व राष्ट्रीय महत्त्व स्पष्ट केले भारत हा विविध भाषा धर्म जाती संस्कृती आणि परंपरांनी समृद्ध असलेला देश आहे या विविधतेमध्ये एकता टिकवून ठेवण्यासाठी परस्परांमध्ये प्रेम विश्वास सहकार्य आणि बंधू भावाची भावना आवश्यक असल्याचे ते म्हणाले यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस एस मुळे यांनीही विद्यार्थ्यांना संबोधित केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रकाश बांगर तर डॉ. कालिदास फड यांनी उपस्थित आमचे आभार मानले.

या कार्यक्रमास डॉ.अश्विनी कुमार चिंचोलीकर, डॉ.नरेश डहाळे, डॉ. लक्ष्मण दांडगे, डॉ.जयश्री पाटील, डॉ.सुखदेव पोटदुखे, प्राध्यापक योगेश शिंदे, डॉ.नानासाहेब लावंड, डॉ.ललित गोल्डे डॉ. इम्रान पठाण, डॉ. लक्ष्मण खरात प्राध्यापक तन्मय भावसार डॉ. किशोर काळे, डॉ. सौरभ चव्हाण, डॉ. नितीन मुळे, डॉ. निखिल साबळे, डॉ. राऊत प्रसन्न वैद्य, भगवंत देशपांडे, रमेश जाधव, कैलास जाधव, मधुकर राठोड, ज्ञानेश्वर जाधव, अलका कुलकर्णी, सुनीता पारेकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचा उपक्रम:४९ विधिज्ञांना मध्यस्थी प्रक्रियेचे प्रशिक्षण

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशानुसार जिल्हा न्यायालयातील ४९ विधिज्ञांना मध्यस्थ म्हणून काम करण्यासाठी ४० तासांचे विशेष प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. हे प्रशिक्षण १६ ते २० या कालावधीत घेण्यात आले.




प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख जिल्हा न्यायाधीश गिरीश अग्रवाल यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव वैभवराज गुळवे पाटील, तसेच प्रशिक्षणासाठी बारामती येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर एस. आर. मोकाशी आणि जालना येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर श्रीमती पी. डी. तारू हे प्रशिक्षक म्हणून उपस्थित होते.

प्रशिक्षणादरम्यान विधिज्ञांना मध्यस्थी प्रक्रिया, पक्षकारांमध्ये सामंजस्य घडवून आणण्याच्या विविध पद्धती, संवाद कौशल्य, मध्यस्थाची भूमिका व जबाबदाऱ्या तसेच मध्यस्थी प्रक्रियेशी संबंधित विविध बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले.

न्यायालयातील प्रलंबित खटले परस्पर सामंजस्याने निकाली काढणे आणि पक्षकारांना जलद व सुलभ न्याय मिळवून देण्यासाठी मध्यस्थी प्रक्रिया अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. प्रशिक्षणाला सहभागी विधिज्ञांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या प्रशिक्षणामुळे मध्यस्थीच्या माध्यमातून न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यास तसेच पक्षकारांना जलद न्याय मिळवून देण्यास मदत होणार आहे.

# सत्तेतून जाण्याच्या भीतीमुळे भाजपच्या गुंडांकडून हल्ले; राजस्थानमधील हल्ल्यावर अभिजीत दिपके यांची प्रतिक्रिया

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- राजस्थानमधील 'कॉक्रोच जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांवर झालेला हल्ला हा भाजपचे नेते आणि पोलिसांच्या संगनमताचा भाग आहे. कारण आता भाजप घाबरली आहे. त्यांच्या विरोधात आता शाळकरी मुलेही आंदोलन करीत आहेत. देशातील जनतेने त्यांना घाबरणे आता बंद केले आहे. त्यामुळेच भाजपने गुंड पाठवून राजस्थानमधील कार्यकर्त्यांवर हल्ला घडविला कारण सत्ता जाईल याची भाजपला भीती आहे, अ्शा शब्दात 'कॉक्रोच जनता पार्टी'चे अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी राजस्थान हल्ल्याचा निषेध नोंदवला. तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या परीक्षेतील संशयास्पद निकालाची चौकशी करण्याची मागणी केली.

महाराष्ट्र राज्य रस्ते महामंडळाच्या परीक्षेत अव्वल ठरलेले काही जण वरिष्ठ अधिकाऱ्यांची मुले आहेत. खरे तर अन्य परीक्षेत त्यांना फारसे यश मिळत नसताना या परीक्षेत ते अव्वल कसे, असा प्रश्न काही परीक्षार्थींनी उपस्थित केला होता. या परीक्षेत जर सारे संशयास्पद असेल तर याची चौकशी व्हायला हवी, असे मत कॉक्रोच जनता पार्टीचे अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी व्यक्त केले. काही तरुणांनी अव्वल येणारे विद्यार्थी एकाच केंद्रावरुन वारंवार परीक्षा देत असल्याचे आपल्या निदर्शनास आणून दिले आहे. हा प्रकार गंभीर असून याची चौकशी व्हायला हवी असे मत दिपके यांनी व्यक्त केले.

आशुतोष राणा यांनी राजस्थान पोलिसांना अगोदरच तेथे काही गुंड आले आहेत असे सांगितले होते. पण पोलीस म्हणाले , 'तुम्ही तुमचे बघा.' त्यामुळे हा हल्ला भाजप आणि राजस्थान पोलिसांचा मिळून केलेला आहे, असे मत आहे. पण आम्ही घाबरणार नाही. या लोकांनी अब्दुलच्या वडिलांचा जीव घेतला. पण विचार करावा लागेल हे हल्ला का करत आहेत. कारण भाजप उघडे पडत आहे. अशीच यांची गुंडगिरी सुरू राहिली तर जनता निवडणुकीत यांना धडा शिकवेल, असे दिपके म्हणाले. गेल्या काही दिवसात २० शाळा फिरलो पण एकही शाळा व्यवस्थित दिसली नाही. मला शिक्षकांनी सांगितले की एक शिक्षिका तीन चार वर्गाला शिकवत आहे. दर्जा पूर्णत : घसरलेला आहे असेही त्यांनी सांगितले.

# मिटमिटा येथील झुलॉजिकल सफारी पार्कच्या कामांना गती देण्याच्या विभागीय आयुक्तांच्या सूचना

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी मिटमिटा येथे साकारल्या जाणाऱ्या झुलॉजिकल सफारी पार्कची पाहणी करून सुरू असलेली कामे दर्जेदार व निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.



यावेळी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे उपस्थित होते. विभागीय आयुक्त व महानगरपालिका आयुक्तांनी सफारी पार्कच्या विस्तीर्ण परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून विविध विकासकामांचा आढावा घेतला.

पार्कमधील प्राण्यांचे नैसर्गिक अधिवास, अंतर्गत रस्ते, संरक्षक भिंती, जलव्यवस्था व पर्यटकांसाठीच्या मूलभूत सुविधांसह सुरू असलेल्या कामांची पाहणी करण्यात आली. या कामांची सद्यस्थिती व आवश्यक बाबींची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेण्यात आली. छत्रपती संभाजीनगर हे आंतरराष्ट्रीय पर्यटन केंद्र असल्याने झुलॉजिकल सफारी पार्कमुळे शहराच्या पर्यटनाला नवी ओळख मिळणार आहे. या दृष्टिकोनातून प्रकल्पातील सर्व कामे गुणवत्तापूर्ण पद्धतीने व निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यावर भर देण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले. वन्यजीवांची सुरक्षा तसेच केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाच्या मानकांचे काटेकोर पालन करावे. उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी योग्य समन्वय ठेवून कामांना वेग द्यावा, अशा सूचनाही विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिल्या.

(पान १ वरुन)

## सणासुदीच्या काळात साखर महागल्याने...

शहरातील मिठाईच्या दुकानांमध्ये सकाळपासूनच विविध प्रकारच्या मिठाई तयार करण्याची लगबग पाहायला मिळते. पेढे, बर्फी, गुलाबजामुन, जिलेबी, लाडू अशा अनेक मिठाई तयार करताना मोठ्या प्रमाणात साखरेचा वापर केला जातो. मात्र, साखरेचे दर वाढल्याने आता मिठाई विक्रेत्यांच्या खर्चाचा ताळमेळ बिघडला आहे. पूर्वी ज्या प्रमाणात साखरेसाठी खर्च होत होता, त्यापेक्षा आता त्याच उत्पादनासाठी अधिक पैसे मोजावे लागत आहेत. साखरेच्या दरवाढीचा थेट परिणाम केवळ मिठाई विक्रेत्यांवरच नाही, तर ग्राहकांच्या खिशावरही होण्याची शक्यता आहे. कारण उत्पादन खर्च वाढल्यास मिठाईचे दर वाढवण्याशिवाय पर्याय नसल्याचं विक्रेत्यांचं म्हणणं आहे.

## पेलेट गन गोळीबार प्रकरणी...

आणि विद्यार्थी आंदोलकांच्या २० जुलैच्या संसदेवरील मोर्चात पॅलेट गनचा वापर झाला होता त्यात साहिल लोचब जखमी झाला होता. साहिल लोचब यानं एफआयर दाखल केल्यानंतर माध्यमांना प्रतिक्रिया दिली. तो म्हणाला की माझं नाव साहिल लोचब असून हिंदू कुटुंबातून येतो. कोणत्याही मीडिया कवरेज शिवाय गेल्या एक महिन्यापासून राहुल गांधी माझ्या संपर्कात होते. मीडियासमोर येण्याचा कोणताही उद्देश नव्हता.साहिल लोचब म्हणाला की तब्येतीची विचारपूस करण्यासाठी राहुल गांधी यांचा फोन आला होता, तेव्हा मी त्यांना एफआयर घेतली जात नसल्याचं सांगितलं. तेव्हा राहुल गांधी उद्या भेटू एफआय आर दाखल करु असं म्हटलं होतं. मी भारतीय जनतेचे आभार मानतो, असंही साहिल यानं स्पष्ट केलं.

एफआयर हे न्यायाच्या दिशेनं पहिलं पाऊल आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते उपस्थित असून देखील एफआयर घेण्यासाठी ८ तासांचा वेळ लागला, असं साहिल लोचब म्हणाला. १४ ऑगस्टपासून एफआयआर दाखल होण्यासाठी फिरत होतो, असंही साहिल लोचब म्हणाला.

## अमित शाह यांना उपपंतप्रधान व्हायचे...

केलेल्या खोट्या घोषणा खपून गेल्या. १५ लाख रुपये खात्यात टाकणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे, नोटबंदीमुळे ५० दिवस मागणे, लॉकडाऊनमध्ये केलेल्या घोषणा खपून गेल्या. गुजरात मॉडेल, विश्वगुरू वगैरेही हवेत विरून गेले. युवकांनी या घोषणा उघड्या पाडल्या आहेत. ही बोगसगिरी आता चालणार नाही, हे युवकांनी सांगितले आहे. त्यामुळेच पंतप्रधान मोदी, मोहन भागवत युवकांबरोबर बोलत आहेत'', अशी टीका पृथ्वीराज चव्हाण यांनी केली. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर केंद्र सरकारकडे एकही व्यक्ती नाही जो या पदाचा भार स्वीकारू शकेल, असेही चव्हाण म्हणाले. शिक्षण मंत्री म्हणून त्यांना एखादा शिक्षणतज्ज्ञ व्यक्ती किंवा एखादा निवृत्त सनदी अधिकारी त्यांना या पदासाठी आणावा लागेल. शिक्षण क्षेत्रातील व्यक्ती ते आणणार नाहीत. कारण संघाच्या मुशीतील लोकांना शिक्षण क्षेत्रात बसवण्यात आले असून ते सर्व सुमार दर्जाचे लोक आहेत, असा आरोप चव्हाण यांनी केला.

## राज्यातील काँग्रेस नेत्यांचा केंद्रातील...

असे सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केले. पक्षाचे संविधान आणि मालकी शरद पवारांकडेच असून पक्ष काढून दुसऱ्याला देणे हा पवारांवर झालेला मोठा अन्याय असल्याचे त्यांनी सांगितले.

बीडमधील विलास घुले प्रकरणात खासदार बजरंग सोनावणे यांच्या मुलाला आरोपी करण्याची मागणी केली जात आहे. यावर बोलताना सुप्रिया सुळे आक्रमक झाल्या. ''गलिच्छ राजकारण घरापर्यंत आणू नका. चुकीच्या पद्धतीने खोट्या केसेस दाखल केल्या तर आम्ही ते सहन करणार नाही. स्वतःची राजकीय पोळी भाजण्यासाठी बजरंग सोनावणेंवर आरोप कराल, तर शरद पवार आणि संपूर्ण राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष त्यांच्या पाठीशी ताकदीने उभा राहील,'' असा थेट इशारा त्यांनी दिला.

काँग्रेस नेते आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे पुण्यात संघटनेच्या कार्यक्रमासाठी येत आहेत. मात्र, त्यांच्या या दौऱ्याला आणि कार्यक्रमाला प्रशासनाकडून घालण्यात येणाऱ्या अटीशर्तींवर सुप्रिया सुळे यांनी सवाल उपस्थित केला. राहुल गांधी हे देशाचे विरोधी पक्षनेते आहेत, ते लोकशाही मार्गाने कार्यक्रम घेत आहेत. मग त्यांच्या संघटनेच्या कार्यक्रमाला एवढ्या अटीशर्ती कशासाठी लावल्या जात आहेत? असा प्रश्न त्यांनी विचारला.

## कर्जमाफीसाठी मंत्र्यांचे बंगले-गाड्यांचा...

मंत्र्यांचे बंगले आणि शासकीय वाहने विकून त्यातून मिळणारा पैसा कर्जमाफीसाठी वापरावा, अशी संतप्त भूमिका तुपकरांनी घेतली आहे. मंत्र्यांकडे स्वतःच्या आलिशान गाड्या आणि राहण्यासाठी पर्यायी व्यवस्था आहे, मंत्री फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये राहू शकतात. पुढील सात दिवसांत शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय झाला नाही, तर २७ ऑगस्टला मुंबईत सकाळी १० वाजेपासून आंदोलनाचा पुढचा टप्पा सुरू करू आणि मंत्र्यांचे बंगले व शासकीय वाहने जप्त करून त्यांचा प्रतिकात्मक जाहीर लिलाव करू, असा इशारा तुपकरांनी दिला आहे. त्यामुळे आता सरकार या आक्रमक इशाऱ्याची कशी दखल घेते आणि कर्जमाफीतील वंचित शेतकऱ्यांसाठी कोणता निर्णय घेते, याकडे राज्यातील शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

## भाजपचा 'वन नेशन, वन पार्टी'चा...

गेल्या १२ वर्षांत तब्बल १५४ वेळा पेपर फुटले आहेत. संसदेत यावर चर्चा करण्याची काँग्रेसची मागणी मोदी-शहा यांनी धुडकावून लावली. वन नेशन, वन इलेक्शनच्या नावाखाली विशिष्ट वर्गाला संधी देत आणि पैशांच्या जोरावर पक्ष फोडत देशात वन नेशन, वन पार्टी निर्माण करण्याचा भाजपचा छुपा डाव असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

सरसंघचालक मोहन भागवत यांनी जेन झी पिढीतील तरुणांसोबत केलेल्या संवादावरही सपकाळ यांनी निशाणा साधला. भागवतांचा तो कार्यक्रम केवळ निवडक मुलांसाठी आयोजित केलेला एक मॅच फिक्सिंग प्रकार होता. मात्र, काँग्रेसचा छात्रों की गुंज हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही तिथे कुणाला पाठवायचे असेल तर त्यांनी खुशाल पाठवावे, असा टोला त्यांनी लगावला. फडणवीसांसारख्या उच्चशिक्षित नेत्याची टीका केवळ अज्ञानातून आलेली आहे. तरुणांच्या वाढत्या पाठिंब्यामुळे भाजपच्या पायाखालची वाळू सरकली असून, त्या भीतीतूनच त्यांना आता तिरंगा यात्रा काढावी लागत आहे, असेही ते म्हणाले.

# महापौरांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाच्या प्रकल्पांचा आढावा

छत्रपती संभाजीनगर दि.२० (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील विविध महत्त्वाच्या विकासकामे व प्रकल्पांच्या प्रगतीबाबत महापौर समीर राजूरकर यांच्या अध्यक्षतेखाली आज आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीस स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, सभागृह नेते गोविंद केंद्रे, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील, अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी संतोष वाहुळे, शहर अभियंता संजय कोंबळे यांच्यासह सर्व उपायुक्त व कार्यकारी अभियंते उपस्थित होते.



बैठकीत महापौर समीर राजूरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालय नवीनिकरण प्रस्ताव बाबत माहिती घेतली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी पुराण वस्तू संग्रहालय विकासासाठी प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे तसेच या कामासाठी जिल्हा नियोजन समितीकडून ११ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आल्याची माहिती दिली. सदरील प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडे पाठविणे योग्य ठरेल, असे महापौरांनी निर्देशित केले.

वेदांतनगर आणि वसंत भवन येथील विविध विकास प्रकल्पांचाही यावेळी आढावा घेण्यात आला. वसंत भवनचे भोगवटा प्रमाणपत्र व संबंधित कागदपत्रे उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. याबाबत आयुक्त अमोल येडगे यांनी पुढील आठवड्यात स्वतंत्र बैठक घेण्याचे निर्देश देत वसंत भवन लवकरात लवकर कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

कांचनवाडी येथील सुरू करण्यात आलेल्या श्वान दफनभूमीच्या कामासह कांचनवाडी व चिकलठाणा येथील वर्किंग वुमन हॉस्टेलच्या कामांचाही आढावा घेण्यात आला. कांचनवाडी येथील हॉस्टेलचे काम फेब्रुवारी २०२७ मध्ये, तर चिकलठाणा येथील हॉस्टेलचे काम जानेवारी २०२७ मध्ये पूर्ण होतील, अशी माहिती देण्यात आली. या दोन्ही प्रकल्पांबाबत दर आठवड्याला पाठपुरावा करून आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश महापौरांनी दिले. याशिवाय दिव्यांग भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वास्तुसंग्रहालय, प्रधानमंत्री आवास योजना, प्रस्तावित पाच नवीन अग्निशमन केंद्रे, रोशनी प्रकल्प, एन-८ रुग्णालय, मेल्ट्रॉन हॉस्पिटल, जाधववाडी बस डेपो, सी अँड डी वेस्ट युनिट, 'आम्हाला खेळू द्या' उपक्रम, गरवारे स्टेडियम येथील साऊथ पॅव्हेलियनचे काम, श्रम साफल्य योजना तसेच अन्य महत्त्वाच्या विकास प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सर्व प्रकल्पांची कामे निर्धारित वेळेत आणि गतीने पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून कार्यवाही करावी, तसेच प्रलंबित बाबींचा नियमित पाठपुरावा करावा, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या.